सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## संजीव मुखियाला क्लिनचीट

नवी दिल्ली : नीट यूजी २०२४ प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणी संजीव कुमार उर्फ संजीव मुखिया याला क्लीन चीट मिळाली आहे. संजीव मुखियाचा प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणी सहभाग असल्याचा कोणताही पुरावा सीबीआय तपासात आढळून आलेला नाही. या प्रकरणी बिहार पोलिसांनी प्राथमिक संशयावरून संजीव मुखियाला आरोपी केले होते. त्यानंतर हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आले होते.

सीबीआयने तपासा दरम्यान, प्रश्नपत्रिका चोरी आणि वितरणातील सर्व आरोपी तसेच चोरीच्या पेपरचा फायदा घेणाऱ्या उमेदवारांची ओळख पटवली. या प्रकरणात उइख ने ४५ आरोपींविरोधात पाटणा न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. मात्र, संजीव मुखियाविरोधात NEET-UG २०२४ पेपर चोरी किंवा वितरणात सहभागाचा पुरावा न मिळाल्याने उइख ने त्याच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले नाही.

## आंदोलन तीव्र

नवी दिल्ली : : दिल्लीतील जंतर-मंतरवर 'कॉकरोच जनता पार्टी'चे (उगझ) धरणे आंदोलन दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालले आहे. या पार्श्र्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून प्रशासनाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. दिल्ली सरकारच्या गृह (पोलीस-२) विभागाने एक महत्त्वपूर्ण अधिसूचना जारी करत दिल्ली पोलीस आयुक्तांना 'राष्ट्रीय सुरक्षा कायद्या' (NS-) अंतर्गत कारवाई करण्याचे विशेष अधिकार दिले आहेत.

# सर्वात मोठा परीक्षा घोटाळा ठाकरेंच्या काळात : फडणवीस

तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठा शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) घोटाळा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडी सरकारच्या काळात घडला. या घोटाळ्यात आयएएस अधिकाऱ्यांपासून ते तत्कालीन मंत्र्यांपर्यंत अनेक जण सामील होते. यात पेपर लीक झालेच, शिवाय नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पास करण्याचा पराक्रम 'मविआ' सरकारच्या काळात झाला, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केला.मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीतील आंदोलन, संसदेतील वाद आणि ठाकरे बंधूंच्या आंदोलनाच्या इशाऱ्याचा जोरदार समाचार घेतला. महाविकास आघाडीच्या काळात टीईटी परीक्षेत झालेल्या गैरव्यवहारांची आठवण करून देत मुख्यमंत्री म्हणाले, आमच्या सरकारने टीईटी परीक्षेत गैरव्यवहार होत असल्याचे लक्षात येताच परीक्षा होण्यापूर्वीच घोटाळेबाजांना अटक करून कठोर कारवाई केली. परंतु, ठाकरे सरकारच्या काळात झालेला घोटाळा आणि भ्रष्टाचाराचा स्तर राज्याने यापूर्वी कधीही पाहिला नव्हता.राहुल गांधी आणि विरोधी पक्षांना खुले आव्हान देत मुख्यमंत्री म्हणाले, विरोधी पक्षांनी पळपुटेपणा सोडून संसदेतील चर्चेला सामोरे जावे. लोकशाहीत निर्णय रस्त्यावर नव्हे, तर संसदेत होतात. जर देशाच्या संविधानावर विश्र्वास असेल तर संसदेत चर्चा करा, उत्तरे मागा आणि तुमच्याकडे काही चांगल्या संकल्पना असतील तर सरकारला त्या अमलात आणण्यासाठी भाग पाडा. परंतु आंदोलनांच्या आधारे आपली राजकीय पोळी भाजणे बंद करा. विद्यार्थ्यांचे हित चर्चेतूनच साध्य होऊ शकते. पेपर लीकप्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्याचा निर्णय मोदीजींनी घेतला आहे. 'नीट'ची पुनर्परीक्षा अत्यंत पारदर्शकपणे पार पडली असून विद्यार्थी खूश आहेत आणि उत्तीर्ण झाल्यावर आनंदोत्सव साजरा करत आहेत.यूपीए सरकारच्या काळात देशाचे शैक्षणिक बजेट अवघे ८ हजार कोटी रुपये होते, ते मोदी सरकारने १ लाख ३९ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवले आहे, याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. आयआयटी, एम्स यांसारख्या आयकॉनिक संस्थांसह वैद्यकीय,



इंजिनिअरिंग आणि व्यवस्थापन शाखांमधील जागा वाढवून तरुणांना मोठ्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. विरोधी पक्षांमध्ये संसदेत चर्चा करण्याची हिंमत नाही. कारण कर्नाटकात पेपर कसा लीक झाला, तेलंगणात कशा प्रकारे गैरव्यवहार झाला, पंजाबमधील 'आप' सरकार आणि राजस्थानमधील काँग्रेस सरकारच्या काळात आठ-आठ वेळा पेपर कसे फुटले, याचे उत्तर त्यांना द्यावे लागेल. स्वतःच्या राज्यातील घोटाळे बाहेर येण्याच्या भीतीने विरोधक चर्चे पासून पळ काढत असून, देशात अराजकता पसरवणे हीच त्यांची मानसिकता आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.-

आंदोलक विद्यार्थ्यांना पोलिसांकडून धमकावले जात असल्याच्या व्हायरल व्हिडिओबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, संबंधित व्हिडिओची चौकशी सुरू असून, चौकशी प्रलंबित असतानाच त्या पोलिसावर कारवाई करून त्याला तिथून हटवण्यात आले आहे.-

दरम्यान, आंदोलनाच्या नावाखाली दगडफेक करणारे आणि पोलिसांवर हल्ला करणारे लोक विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी आलेले नव्हते. या आंदोलनाचा फायदा घेऊन अराजकता माजवणारे हे घटक होते. आंदोलनकर्त्यांनीही अशा देशविरोधी आणि हिंसक प्रवृत्तींपासून सावध राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

# महाराष्ट्रात सन २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : महाराष्ट्रात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून, शेतकऱ्यांना त्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.



पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही शेवटची तारीख आहे. खरीप हंगामातील भात, खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस आणि खरीप कांदा या १४ अधिसूचित पिकांसाठी ही योजना लागू आहे. या योजनेत भाग घेण्यासाठी किमान ०.१० हेक्टर पिकाखालील क्षेत्र असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के विमा हप्ता भरून सहभाग नोंदवावा लागेल. कापूस आणि कांदा या व्यापारी पिकांसाठी हा विमा हप्ता विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के राहील. योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांचा ॲग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक आणि डिजिटल क्रॉप सर्वे बंधनकारक आहे. डिजिटल क्रॉप सर्वेतील पीक आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास सर्वेमध्ये नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरले जाईल आणि तफावत आढळल्यास अर्ज रद्द होईल.

शेतकरी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पीक विमा पोर्टल वर स्वतः ऑनलाइन अर्ज भरू शकतात किंवा ई-सेवा केंद्राची , बँक किंवा वित्तीय संस्थेची मदत घेऊ शकतात. विमा अर्ज भरण्यासाठी केंद्र शासनाने ई-सेवा केंद्रास प्रति शेतकरी ४० रुपये मानधन निर्धारित केले आहे, जे संबंधित विमा कंपनीमार्फत दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क अदा करू नये, अन्यथा अर्ज रद्द होईल.

# महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम!

## राज्यात आतापर्यंत सरासरीच्या ९५ टक्क्यांहून अधिक पाऊस

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने जाहीर केलेल्या पाच दिवसांच्या अंदाजानुसार आज (२३ जुलै) नाशिक घाट, पालघर, पुणे घाट आणि घाटमाथा परिसरासाठी रेड अलर्ट, तर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड आणि सातारा घाटासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत अतिवृष्टी, विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि जोरदार वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.


हवामान विभागाच्या अंदाजानुसार सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, नंदुरबार, धुळे, नाशिक, जळगाव, बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. नागरिकांनी आवश्यक नसल्यास घाटमाथा आणि नदीकाठच्या भागात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.


दरम्यान, राज्यातील पावसाची आकडेवारीही समाधानकारक आहे. २३ जुलैपर्यंत महाराष्ट्रात सरासरी ४२९ मिमी पावसाची नोंद झाली असून ती सरासरीच्या ९४.६८ टक्के इतकी आहे. बहुतांश जिल्ह्यांमध्ये 'लार्ज एक्सेस' म्हणजेच सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

यामध्ये रायगडमध्ये १,८६०.४ मिमी, पालघरमध्ये १,६९९.७ मिमी, रत्नागिरीत १,६५७.४ मिमी आणि ठाण्यात १,५३५.९ मिमी इतक्या पावसाची नोंद



झाली आहे. एका दिवसात सर्वाधिक १८३ मिमी पाऊस पालघर जिल्ह्यात, तर ९५ मिमी पाऊस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. हवामान विभागाने पुढील २४ ते ४८ तास नागरिकांनी सतर्क राहण्याचा सल्ला दिला असून, मुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे तसेच घाट परिसरात दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे सांगितले आहे.

# जंतर-मंतर आंदोलनाच्या समर्थनार्थ कन्नड बंदला संमिश्र प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

कन्नड - दि. २३ जुलै - दिल्ली येथील जंतर-मंतर येथे आयोजित आंदोलनाच्या समर्थनार्थ वंचित बहुजन आघाडी, भारतीय बौद्ध महासभा व विविध आंबेडकरी संघटनांच्या वतीने कन्नड शहरात बंदचे आवाहन करण्यात आले. या बंदला शहरात संमिश्र प्रतिसाद मिळाला.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पूर्व जिल्हाध्यक्ष अरविंद कांबळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक देविदास राठोड, तालुकाध्यक्ष सुनील सिरसाठ, रईस सौदागर, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष रमेश धनेधर, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव चौतमल, आरपीआय तालुकाध्यक्ष संदीप सातदिवे,तालुका संघटक ईश्वर गायकवाड, तालुका महासचिव धर्मा मोरे, तालुका उपाध्यक्ष धम्मपाल पैठणे, रवी गरूड, भास्करराव जाधव, रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष बाबासाहेब शिरसाठ, भारतीय बौद्ध महासभा कन्नडच्या तालुका महिला अध्यक्षा लता अवचार, तालुकाध्यक्ष कल्पना मनवर, सचिव मंगलताई कांबळे, पद्मा गजबे, बबिता जाधव, जिल्हा संघटक राजेंद्र पगारे, सतीश धनेधर, रविंद्र डोंगरे, राकेश पवार, राहुल सातदिवे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 14 वर्षांनंतर नव्या रूपात सावित्रीबाई फुले भाजीमंडईचे लोकार्पण

## मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन; अतिक्रमण खपवून घेणार नसल्याचा महापौर समीर राजूरकर यांचा इशारा

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने बीओटी (BOT) तत्त्वावर विकसित करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले भाजीमंडई संकुलाचे बुधवारी राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. तब्बल १४ वर्षांनंतर नव्या आणि आधुनिक स्वरूपात सुरू झालेल्या या भाजीमंडईमुळे व्यापारी व ग्राहकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर समीर राजूरकर होते.



लोकार्पणापूर्वी मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सहा भाजी विक्रेत्यांना प्रातिनिधिक स्वरूपात हक्काच्या ओट्यांची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी मंत्री अतुल सावे यांनी शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक आणि नियोजनबद्ध बाजारपेठा उभारण्याची आवश्यकता व्यक्त केली. व्यापाऱ्यांना दर्जेदार सुविधा आणि नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित बाजारपेठ उपलब्ध करून देणे हे शासनाचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच हा प्रकल्प साकारण्यासाठी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे त्यांनी कौतुक केले.

महापौर समीर राजूरकर यांनी भाजीमंडई परिसरात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण सहन केले जाणार नसल्याचे स्पष्ट करत प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले. उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी हा प्रकल्प नागरिकांच्या सोयीसाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले.

आयुक्त अमोल येडगे यांनी ही भाजीमंडई आधुनिक नियोजन व प्रभावी व्यवस्थापनाचा आदर्श नमुना असल्याचे नमूद केले. कार्यक्रमास आमदार प्रदीप जैस्वाल, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, विरोधी पक्षनेते समीर साजिद, पदाधिकारी, नगरसेवक, भाजी विक्रेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक आणि नगरच्या पाण्याने जायकवाडीची आशा कायम

तभा वृत्तसेवा

**पैठण दि २३ :-** नाशिक परिसरात दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मोठ्या पावसाने गोदावरी नदीला पूर येत गंगापूर धरण काठोकाठ भरले असून पावसाचा जोर कायम असल्याने या धरणातून जायकवाडी ( ना थ सा ग र ) धरणाकडे १२ हजार ६०० क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला. नाशिक आणि अहिल्यानगर भागात चांगला पाऊस असल्याने जायकवाडी धरण भरण्याची आशा कायम आहे. नाथसागर पाणलोट क्षेत्रातील नांदूर मधमेश्वर धरणातून गुरुवारी दुपारी ३ वाजता ५५ हजार ७७८ क्यूसेक प्रमाणे नाथसागरच्या दिशेने पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.



परवा पासून नाशिकसह अहिल्यानगर जिल्ह्यात चांगला पाऊस असल्याने नाशिकच्या रामकुंड परिसरात गोदावरीच्या पूराचे पाणी घुसल्याने त्याठिकाणी रेस्क्यू मोहीम राबवण्यात आली तसेच परिसरातील ११ फुटांच्या दुतोंड्या मारुतीच्या गळ्यापर्यत पूराचे पाणी आले होते. हा दुतोंडया मारुतीराया पूर्ण पाण्यात बुडाल्यास पैठणचे जायकवाडी धरण १०० टक्के भरते असे जाणकारांचे म्हणणे आहे. गुरवार दिनांक २३ जुलै रोजी नाथसागर धारणाची पाणी पातळी ३१.०७ टक्के एवढी होती तर ११९ प्रमाणे आवक सुरु होती.पाणलोट क्षेत्रातील नांदूर मधमेश्वर ५५७७८,कडवा १०९६५, पालखेड ९४३६, होळकर ब्रिज १७३९७, दारणा १५४९८ क्यूसेक तसेच ईतर धरणातून जायकवाडी धरणाच्या दिशेने हजारो क्यूसेस प्रमाणे पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.हे पाणी येत्या २४ तासात नाथसागराला मिळणार आहे.

# सोयगावच्या नैसर्गिक पर्यटन स्थळांची पर्यटन विभागाकडून पाहणी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ जुलै

सोयगाव तालुक्यातील ऐतिहासिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांच्या विकासाला गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या विशेष पुढाकारातून सादर करण्यात आलेल्या 'सोयगाव पर्यटन विकास प्रस्ताव' अनुषंगाने आज पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांनी रुद्रेश्वर लेणी,वाडी किल्ला,गंगाधार धबधबा आणि जंजाळा किल्ला या महत्त्वाच्या पर्यटनस्थळांची प्रत्यक्ष पाहणी केली.यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील पर्यटन संचालनालयाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत पुष्पाताई काळे यांच्या



मार्गदर्शनाखाली तेजस्विनी काळे यांनी सोयगाव परिसरातील १४ प्रमुख पर्यटन स्थळांच्या सर्वांगीण विकासाचा प्रस्ताव अधिकृतपणे सादर केला होता.या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत पर्यटन विभागाने प्रत्यक्ष पाहणीला सुरुवात केली आहे.

प्रादेशिक उपसंचालक विजय जाधव यांच्या मार्गदर्शना खाली आजच्या पाहणी दौऱ्यात जिल्हा पर्यटन अधिकारी अजुमुद्दीन शेख तसेच जिल्हा पर्यटन कृषी अधिकारी शिवाजी गायकवाड यांनी पर्यटन विभागाच्या पथकासह रुद्रेश्वर लेणी,वाडी किल्ला,गंगाधार धबधबा आणि जंजाळा किल्ला या स्थळांची पाहणी करून पर्यटन विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा,रस्ते, दिशादर्शक फलक, पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा आणि संवर्धनाच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा आढावा घेतला. सोयगाव तालुक्यातील रुद्रेश्वर लेणी,वाडी किल्ला,गंगाधार धबधबा,जंजाळा किल्ला यांसारख्या ऐतिहासिक आणि निसर्गरम्य स्थळांचा पर्यटनस्थळ म्हणून विकास झाल्यास राज्यभरातील पर्यटकांना आकर्षित करण्यास मोठी मदत होईल.यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील,पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल आणि सोयगाव तालुक्याच्या आर्थिक विकासालाही मोठी गती मिळेल.रुद्रेश्वर लेणी,वाडी किल्ला,गंगाधार धबधबा आणि जंजाळा किल्ला ही स्थळे लवकरच विकसित पर्यटनस्थळांच्या नकाशावर झळकतील,अशी आशा व्यक्त होत असून सोयगावच्या पर्यटन विकासासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

# किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या आंदोलनाविरोधात भाजपचे जोरदार निदर्शने



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर महानगरच्या वतीने बुधवारी शहागंज येथील गांधी भवन परिसरात काँग्रेसने पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्र सरकारच्या जनहिताच्या निर्णयांना पाठिंबा दर्शवत काँग्रेसच्या भूमिकेवर भाजप पदाधिकाऱ्यांनी टीका केली. या आंदोलनात राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, माजी आमदार संजय केणेकर, महापौर समीर राजूरकर, स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना भाजप नेत्यांनी काँग्रेसचे आंदोलन हे राजकीय हेतूने प्रेरित असून लोकशाही परंपरेला बाधा पोहोचवणारे असल्याचा आरोप केला. केंद्र सरकारच्या विकासाभिमुख आणि जनहिताच्या निर्णयांवर जनतेचा विश्वास असल्याचे सांगत भाजप कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करून काँग्रेसच्या आंदोलनाचा निषेध नोंदविला.

# भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण अभियानाचा घेतला आढावा

## बुथ प्रमुखांनी बीएलओंना सहकार्य करण्याच्या आ.प्रशांत बंब यांच्या सूचना

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२३ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत विविध सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिवसभराच्या दौऱ्याची सुरुवात वाळूज येथे झालेल्या SIR (Special Intensive Revision) आढावा बैठकीने झाली.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (SIR) अभियानाचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी बीएलओंना (Booth Level Officers) भाजपच्या बूथ प्रमुखांनी आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन आमदार प्रशांत बंब यांनी बैठकीत केले. मतदार नोंदणी, पडताळणी आणि पुनर्निरीक्षणाचे काम वेळेत व अचूक पूर्ण करण्यासाठी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीस तहसीलदार नवनाथ वगवाड, नायब तहसीलदार मयुरा पेरे, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक शेषराव जाधव, नंदकुमार गांधीले, अमोल जाधव, भाजप तालुकाध्यक्ष रवी चव्हाण, संतोष जाधव यांच्यासह बूथ प्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिशोर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धडक कारवाई ; 11 जणांवर गुन्हा, ₹5.19 लाखांचा मुद्देमाल जप्त

**कन्नड - दि. २३ जुलै :** पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे लोहगाव शिवारात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पिशोर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई करत ११ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटारसायकली व जुगाराचे साहित्य असा एकूण ₹५ लाख १९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २२ जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास मौजे लोहगाव शिवारातील संतोष कडुबा पारखे यांच्या शेतात काही इसम "झन्ना मन्ना" नावाचा पैशांचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पिशोर पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पोलिस पथकाने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी जुगार खेळणाऱ्या ११ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमाच्या कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल फोन, मोटारसायकली तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे ५२ पत्त्यांचे कॅट आणि अन्य साहित्य असा एकूण ₹५,१९,७०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पिशोर पोलीस ठाण्यामार्फत सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री (कन्नड उपविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पिशोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक फरतडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल बर्डे, पोलीस कॉन्स्टेबल अन्सार पटेल, गणेश कव्वाल, पवन खंबाट व इतर अंमलदारांनी यशस्वीपणे पार पाडली.

# आषाढी एकादशीसाठी नाथनगरी सज्ज

**तभा वृत्तसेवा पैठण दि २३ :-** आषाढी वारीत सहभागी होण्यासाठी पंढरपूरला न जाता आलेले हजारो वारकरी भाविक भक्त पैठणनगरीत दाखल होत असून भाविकांच्या दर्शनासाठी संस्थानचे अध्यक्ष, जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थान श्री संत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आल्याची माहिती कार्यकारी विश्वस्त श्री बाजीराव (दादा)बारे यांनी दिली.

देशनिवारी वशवनी आषाढी एकादशीत २५ जुलै शनिवार रोजी लाखो भाविकांना शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज समाधीचे दर्शन व्हावे यासाठी दर्शन व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शन रांगेत लागलेल्या भक्तांना बैठक व्यवस्था, १० क्यूँटल फराळ,थंड पाणी, शौचालय व्यवस्था करण्यात आली आहे. मोठा पाऊस आल्यास संपुर्ण मंदिर परिसर वॉटर प्रूफ करण्यात आले आहे.. तसेच संपूर्ण मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहे. त्याच प्रमाणे पोलीस कक्ष व वैदयकीय कक्ष ही मंदिर परिसरात ठेवण्यात आले आहे. त्यापाठोपाठ विश्वस्त मंडळ व विलास बाप्पू प्रतिष्ठाण यांच्या रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात आल्या आहेत.भाविकांची गर्दी पाहता अन्नछत्र व भक्त निवास व्यवस्था वाढवण्यात आली आहे. तसेच भाविकांना मंदिर परिसरात येण्यासाठी कावसणकर स्टेडियम जवळील प्रवेश कमानीचे काम ही पूर्ण करण्यात आल्याने तेथून भाविकांना आता येता येणार आहे.

आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या निगराणीत एकादशी काळात भाविक भक्तांना कुठल्याही प्रकारची गैरसोय होणार नसून यासाठी संस्थान श्री संत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळ विशेष परिश्रम घेत असल्याची माहिती कार्यकारी विश्वस्त श्री दादा पाटील बारे यांनी दिली आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यक साहित्य वाटप; 79 विद्यार्थ्यांसाठी मोजमाप शिबिर संपन्न

कन्नड - दि. २३ जुलै - पंचायत समिती कन्नड येथील शिक्षण विभाग, समग्र शिक्षा अभियान आणि अलीम्को (ALIMCO) यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सहाय्यक साहित्य वाटप तसेच आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी मोजमाप व वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील विविध शाळांतील ७९ दिव्यांग विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एम. मित्रू, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, गटशिक्षणाधिकारी सबाहत मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर, जिल्हा समन्वयक गणेश बेडके, अविनाश बावणे आणि विशेष तज्ज्ञ नितीन वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर पार पडले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण विभागातील अधिकारी, विशेष शिक्षक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक तसेच अलीम्कोच्या तांत्रिक पथकाने सहकार्य केले. कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक संदीप कुलकर्णी, विनोद राठोड, साधनव्यक्ती संदीप कुलकर्णी, अफरोज शेख, नीलम परदेशी, खुशाल राठोड, राजेंद्र फरकाडे, कडुबा भुसारी, शिवाजी घुले, प्रशांत अहिराव, प्रविण वाकेकर, उत्तम आघाडे, अयुब सय्यद, युनूस सय्यद, असिफ शेख आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम आघाडे यांनी केले, तर आभार प्रविण वाकेकर यांनी मानले.

# कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

जावक क्र.: १४०/२०२६-२७140 दिनांक: २३/०७/२०२६

## जाहीर प्रगटन

कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड यांच्यामार्फत सर्व नोंदणीकृत व्यापाऱ्यांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्ड, कन्नड येथील 08 पैकी शॉपकम गोदाम क्रमांक 04 हा बाजार समितीच्या सर्व अटी, शर्ती, नियम, उपनियम तसेच वेळोवेळी करण्यात येणाऱ्या तरतुदींना अधीन राहून 29 वर्षांच्या मुदतीसाठी नोंदणीकृत भाडेपट्ट्याद्वारे भाडेकराराने देण्याचा प्रस्ताव आहे. सदर शॉपकम गोदाम क्रमांक 04 हे पूर्वी श्री. वैभव विजय अग्रवाल यांना 29 वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यास मंजूर करण्यात आले होते. श्री. वैभव विजय अग्रवाल यांनी सदर मंजुरीवरील आपले हक्क श्री. शिवाजी देविदास मनगटे यांच्या नावे भाडेकरार करण्यास लेखी संमती दिलेली आहे. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जानुसार व बाजार समितीचे नियम, उपनियम तसेच प्रचलित कार्यपद्धतीनुसार आवश्यक नोंदी हस्तांतरण रजिस्टरमध्ये करून नोंदणीकृत भाडेपट्ट्याच्या आधारे भाडेकरार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी या प्रस्तावाबाबत कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्यास हरकत अथवा सूचना असल्यास किंवा इतर इच्छुक नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी अर्ज सादर करावयाचा असल्यास त्यांनी आपले अर्ज व हरकती दिनांक 24/07/2026 ते 01/08/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड येथे लेखी स्वरूपात सादर करावेत. निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत किंवा अन्य अर्ज प्राप्त न झाल्यास, प्राप्त अर्जावर नियमानुसार निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. कोणताही अर्ज मंजूर करणे अथवा नामंजूर करणे याबाबतचे सर्व अधिकार कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड यांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. टीप - निर्धारित मुदतीपर्यंत कोणतीही हरकत अथवा अन्य अर्ज प्राप्त न झाल्यास, नियमानुसार सदर शॉपकम गोदामाचा भाडेपट्टा हस्तांतरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सभापती
डॉ. श्री. राठोड मनोज माहारू

उपसभापती
श्री. बोरसे जयेश काकासाहेब

प्र सचिव
श्री. कदम कुनाल रघुनाथ

कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.

# बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य टिळक जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन २३ जुलै पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल येथे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रणेते, थोर राष्ट्रनेते आणि समाजजागृतीचे प्रेरणास्थान लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" हा लोकमान्य टिळकांचा प्रेरणादायी विचार आजही प्रत्येक भारतीयाला राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देतो. त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली. तसेच शिक्षण, सामाजिक जागृती आणि स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे योगदान अतुलनीय असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन देशाचे सुजाण नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-507

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

दिनांक 10-07-2026

अर्जदार ०:- शेख अनवेज शेख अनवर रा. गौरीपुरा बंगला कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः शेख अनवेज शेख अनवर चा जन्म दिनांक 02-01-1989 रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक 02-01-1989 रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा स्वतः शेख अनवेज शेख अनवर यांचा जन्म दिनांक 02-01-1989 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 19-08-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 02-01-1989 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ......../07/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-506

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

दिनांक 10-07-2026

अर्जदार ०:- शेख अफजल शेख अनवर रा. गौरीपुरा बंगला कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा स्वतः शेख अफजल शेख अनवर चा जन्म दिनांक 30-09-1985 रोजी कनड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः चा जन्म दिनांक 30-09-1985 रोजी कन्नड ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा स्वतः शेख अफजल शेख अनवर यांचा जन्म दिनांक 30-09-1985 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 19-08-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 30-09-1985 रोजी कन्नड ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ......../07/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश क. स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

दि.कि.अर्ज नं. ४८३/२०२६

अर्जदार -१) लक्ष्मीबाई विठ्ठल राऊत वय ८३ वर्षे, धंदा - निरंक
२) पांडुरंग विठ्ठल राऊत वय ६० वर्षे, धंदा मजुरी
३) मनोहर विठ्ठल राऊत वय ५७ वर्षे, धंदा व्यवसाय
सर्व रा. वाळूज बु. ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण -कलम ३७२ भारतीय वारसा कायदा प्रमाणे वारस प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टीफिकेट) मिळणेबाबत तसेच हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विधिज्ञ एम. बी. गुडदे यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील नामे विठ्ठल गणपत राऊत हे दि. २३.०३.२०२६ रोजी मौजे वाळूज बु. ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. अर्जदार हे मयत विठ्ठल गणपत राऊत यांचे एकमेव कायदेशीर वारस आहे. अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाही. मयत विठ्ठल गणपत राऊत यांच्या नावे महाराष्ट्र ग्रामीण बैंक शाखा मौजे वाळूज बु. येथे असलेली रक्कम अर्जदार क्र. १ यास मिळण्याकामी, तसेच मयताच्या नावे मौजे वाळूज येथील ग्राम पंचायत मिळकत नं. ५७१ ही अर्जदार क १ च्या नावे करणेकामी अर्जदारांनी मयत विठ्ठल गणपत राऊत यांचे वारस असल्याबाबतचे कायदेशीर वारस प्रमाणपत्राचा (सक्सेशन सर्टीफिकेट) मागणी या न्यायालयास केली आहे.

त्याअर्थी वरील अर्जदाराच्या नावे मयत विठ्ठल गणपत राऊत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत, आक्षेप असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वताः किंवा त्यांच्या विधिज्ञामार्फत हजर होवून आपला आक्षेप मांडावे. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही व सदर अर्जास कुणाचीही हरकत, आक्षेप नाही असे समजून वरील सर्व अर्जदार नं. १ नावे ते मयत विठ्ठल गणपत राऊत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत

कनिष्ठ लिपिक | सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर

## पाहिजेत

**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, हिंगोली संचलित**

# शिवाजी महाविद्यालय, हिंगोली ता. जि. हिंगोली

## प्रत्यक्ष मुलाखती

शिवाजी महाविद्यालयातील (अनुदानित) शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता घडयाळी तासिका तत्वावर खालील विषयाचे पदे भरावयाची आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या नियमाप्रमाणे पात्र व अनुभवी तसेच इच्छुक उमेदवारांनी आपल्या आवश्यक त्या सर्व मुळ प्रमाणपत्रासह बायोडाटासह दिनांक २८/०७/२०२६ रोज मंगळवार सकाळी ११.०० वाजता शिवाजी महाविद्यालयात प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ.क्र. | विषय | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | उर्दू | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | सहसंचालक उच्च शिक्षण, नांदेड यांचे ना-हरकत पत्र क्र.जा.क्र. JDNAN-NG-COANUH(HNGL)/४१/२०२६-Court (सुधारीत) दिनांक ०३/०७/२०२६ |
| २. | समाजशास्त्र | ०१ | एम.ए. नेट/सेट पीएच.डी. | |
| ३. | इतिहास | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ४. | राज्यशास्त्र | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ५. | अर्थशास्त्र | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ६. | शा.शिक्षण | ०१ | एम.पी.एड/सेट पीएच.डी. | |
| ७. | लोकप्रशासन | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ८. | तत्वज्ञान | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| | एकुण | ०८ | | |

**कायम विनाअनुदानित मानधन तत्वावर शै. वर्ष २०२६-२७ करिता वाणिज्य शाखेसाठी खालील पदे भरणे आहे.**

| अ.क्र. | विषय | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | वाणिज्य | ०२ | एम.कॉम. नेट/सेट पीएच.डी. | |

नोट :- नेट/सेट पीएच.डी. धारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास किमान आर्हता धारक उमेदवारांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर केली जाईल. वरील पदापैकी ५०% टक्के पद ही आरक्षणातुन भरली जातील. मुलाखतीस येताना उमेदवारांनी स्वतःच्या हस्ताक्षरातील अर्जाची प्रत सर्व प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिसह मुलाखतीपुर्वी कार्यालयात दाखल करावीत व मुळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करावीत. मुलाखतीस येण्याऱ्या उमेदवारांना प्रवास व इतर भत्ता दिला जाणार नाही.

स्थळ
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
अध्यक्ष/सचिव

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली
प्र-प्राचार्य

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवा : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची मागणी : महावितरणला निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** स्मार्ट मीटरच्या सक्तीच्या अंमलबजावणीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने गुरुवारी परभणी येथील महावितरण कार्यालयात अधीक्षक अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले. राज्यभरात स्मार्ट मीटरबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आणि शंका निर्माण झालेल्या असताना हा निर्णय जनतेवर सक्तीने लादू नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून वीज ग्राहकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करून स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी आणि नागरिकांच्या शंका-समाधानासाठी व्यापक जनजागृती करण्यात यावी. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जनहिताच्या विरोधातील कोणत्याही निर्णयाला पक्षाकडून ठाम विरोध करण्यात येईल, अशी भूमिका मांडली. सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यास सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी माजी खासदार डॉ. फौजिया खान, माजी आमदार सुनील भुसारा, माजी आमदार विजय गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्तीआंबिरे, पंकज बोराडे, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष बोबडे, परभणी निरीक्षक तथा माजी आमदार संजय वाघचौरे, जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे, दिव्यांग जिल्हाध्यक्ष सय्यद युनूस भैया यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि वीज ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रेया परीक्षेत बाल विद्या विहारच्या ३१ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश : ७ विद्यार्थ्यांना ट्रॉफी, तर २४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक; गुणवंतांचा गौरव

**परभणी,/प्रतिनिधी :** नुकताच जाहीर झालेल्या श्रेया इंटेलिजंट अकॅडमी सर्च परीक्षेच्या निकालात बाल विद्या विहारच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत प्रशालेच्या एकूण ३१ विद्यार्थ्यांनी यश मिळविले असून त्यापैकी ७ विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सन्मानचिन्ह, तर २४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशालेचे मुख्याध्यापक नितीन गोरडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

इयत्ता पहिली ते चौथीमधील १८ विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले. ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता चौथी (इंग्रजी माध्यम) मधील श्लोक निलेश टिवटनकर, इयत्ता पहिलीतील प्रज्वल मयूर टाक, इयत्ता सहावीतील सई भागवत खराबे तसेच इयत्ता सातवीतील श्रेया स्वदेश कदम, अनन्या महेश कुन्हे आणि चैतन्य दत्ता खंदारे यांचा समावेश आहे.

सुवर्णपदक विजेत्यांमध्ये इयत्ता पहिलीतील कैवल्य ज्ञानदेव पातळे, इयत्ता दुसरीतील देविका रामदास कदम, रुद्र विष्णू शेळके आणि शिवांश राजेश्वर जुकटे, इयत्ता तिसरीतील स्वानंदी गिरीश दैठणकर, कृतिका दिनेश जाधव, निकुंज गोपाल भुतडा, दुर्गा अमोलराव देशमुख आणि ध्रुव धनंजय शिंदे यांचा समावेश आहे. इयत्ता चौथीमधील अथर्व प्रसाद कानडखेडकर, रणविजय रत्नेश्वर भिसे, राजवीर शंकरराव गायकवाड, स्वराज सुजितसिंग सूर्यवंशी, शौर्य अजय कांबळे, शेषराव अर्पण देवडे आणि रणवीर अमोल जाधव यांनीही सुवर्णपदक प्राप्त केले.

तसेच इयत्ता पाचवीतील पार्थ पांडुरंग टेकाळे, इयत्ता सहावीतील श्रावणी किरण मोरे, पुष्कर शिरीष बोरोले, शुभ्रा शिवाजी भोंडवे, सई भागवत खराबे आणि ज्ञानेश राम खरबे, तर इयत्ता सातवीतील अधिराज अभय देशमुख, सिद्धी विनोद रसाळ आणि राधिका शरद पवार यांनी सुवर्णपदकासह प्रमाणपत्र प्राप्त केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना भाग्यश्री शेटे, स्वाती कुलकर्णी, प्राजक्ता कानडखेडकर, विशाखा दैठणकर, सुनिता दैठणकर, सारिका डहाळे, स्मिता उपाध्ये, सुजाता शेवाळे, आदित्य शिंदे, आनंद बदाले, केशव पराड, नझीर शेख, दत्ता देवकर आणि नागेश जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. नंदकुमार झरकर, उपाध्यक्ष ड. विलास पोहंडूळकर, सचिव डॉ. विवेक नावंदर, सहसचिव ड. संजय देशपांडे, कोषाध्यक्ष विनय नावंदर, सदस्य ड. अशोक सोनी, पवनकुमार झांजरी, मल्हार विहीटकर, सदस्या डॉ. अनिता विवेक नावंदर, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

# 'त्या' १९ कोटीतून काही रस्ते व नाल्यांची कामे होणार

## महानगरपालिका प्रशासनाद्वारे माहिती : नगरविकास खात्याद्वारे तरतूद मंजूर

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** महानगरपालिका क्षेत्रांतर्गत मूलभूत सोयी सुविधांच्या विकास कामांसाठी नगरविकास विभागाने विशेष तरतूद योजनांतर्गत पहिल्या टप्प्यात १९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीतून काही प्रभागांतर्गत रस्ते व नाल्यांची बहुतांशी कामे केली जाणार आहेत.

राज्याच्या नगर विकास विभागाने लेखाशीर्ष २२१७०९१३ अंतर्गत मूलभूत सोयी सुविधांच्या विकासाकरीता २० जूलै रोजी पहिल्या टप्प्यातून १९ कोटी रुपयांची तरतूद मंजूर केली. या तरतूदीतून महापालिका प्रशासनाने एकूण २८ कामे पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. विशेषतः यातून सीसी रस्ते, डांबरी रस्ते, नाल्यांची कामे बहुतांशी केली जाणार आहेत.

प्रभाग क्रमांक १ मधील निलेश पतंगे यांच्या घरापासून कामखेडे यांच्या घरापर्यंतच्या सिमेंटच्या रस्त्याकरीता ५० लाख, लोकाशा नगरातील गरड यांच्या निवासस्थानापासून प्रसाद कुलकर्णी यांच्या निवासस्थानापर्यंतच्या सिमेंट रस्त्यास ५० लाख, कलावती देवी मंदिर ते पारदेश्वर मंदिरापर्यंतच्या रस्त्यास १ कोटी ५० लाख, विसावा कॉर्नर ते जिंतूर रोड जोडणारा डीपी रस्ता व नाली बांधकामास १ कोटी, बी. रघुनाथ महाविद्यालया जवळील मनपाच्या खेळाचे मैदान विकसित करण्याकरीता ७५ लाख, प्रभाग २ अंतर्गत बरकत नगर परिसरातील रस्ता व नाली करीता १ कोटी, गुलजार कॉलनीतील नूर अल कुरआण मशीद ते आदिल खान यांच्या घरापर्यंतच्या आरसीसी नाली बांधकामाकरीता ३५ लाख, आनंद नगर येथील खाजा गरीब नवाब मस्जिद ते आयात खान यांच्या घरापर्यंतच्या नाली कामास ४० लाख, प्रभाग क्रमांक ३ ब अंतर्गत उस्मानीया कॉलनी परिसरातील सिमेंट नाल्यांच्या कामांकरीता १ कोटी, प्रभाग क्रमांक ४ अंतर्गत मातोश्री नगरातील रस्ता व नालीच्या कामाकरीता ७५ लाख, यशवंत नगर ते रचना नगर परिसरातील



नाली कामांकरीता २५ लाख, प्रभाग क्रमांक ७ ब मधील समर्थ प्लॉटींग परिसर फरहान भाई यांच्या घरापासून ते इलियास भाई यांच्या घरापर्यंतच्या सिमेंट नाली करीता १५ लाख, प्रभाग ७ ब मधील वजीराबाद परिसरातील तौहीद भाई यांच्या घरापासून इंगोले बाई यांच्या घरापर्यंतच्या दुतर्फा सीसी नाली कामाकरीता १५ लाख, प्रभाग ७ ब मधील अपना कॉर्नर परिसरात नॅशनल पानपट्टीपासून अब्दुल मन्नान यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजूने सीसी नाली करीता ५० लाख, पथदिव्यांच्या पोल उभारणीकरीता २० लाख, तसेच प्रभाग क्रमांक ८ अ मध्ये पी.डी. जैन कॉलेज ते पाडेला हॉल, पाडेला हाऊस ते शेख अखील यांचे घर व एजाज ते मोहसीन भाई टेल ते शोएब रिजवी यांचे घरापर्यंतच्या रस्त्या करीता १ कोटी, प्रभाग क्रमांक ९ मधील रस्ते व नाली करीता ५० लाख, प्रभाग ९ क मधील रस्ता आणि नाली बांधकामाकरीता ५० लाख, प्रभाग १२ अ अंतर्गत पंचवटी नगर, नगर परिषद व जम जम कॉलनी रस्ता मजबुतीकरण व नाली बांधकामाकरीता १ कोटी, प्रभाग क्रमांक १२ मधील मंत्री नगर व पंचशील नगरातील नाली आणि रस्ते कामाकरीता १ कोटी, प्रभाग १२ ड मधील छत्रपती विद्यालय हनुमान मंदिर पंचवटी नगर ते परसावत नगर रस्ते व नाली कामाकरीता १ कोटी, प्रभाग १४ अंतर्गत काद्राबाद परिसरातील नाली व रस्ते कामा करीता १ कोटी, प्रभाग १५ अ अंतर्गत शंकर नगर व खानापूर परिसर, माऊली नगर, बालाजी नगरातील रस्ते व नाली बांधकामाकरीता १ कोटी, प्रभाग १६ मधील भीम नगर ते अक्षय प्रोव्हीजन ते शेख मतीन यांच्या घरापर्यंत डांबरी रस्त्यासाठी १५ लाख, प्रभाग १६ मधील काकडे नगरातील राजाभाऊ नन्नवरे यांच्या घरापासून राम कुलथे यांच्या घरापर्यंतच्या रस्ते कामाकरीता ५० लाख, प्रभाग क्रमांक १६ क अंतर्गत विठ्ठल-रुख्मिणी मंदिर ते पिंगळगड नाला नाला बांधकामाकरीता ५० लाख, प्रभाग क्रमांक १६ क अंतर्गत साखला प्लॉट भागातील रस्ते कामाकरीता ५० लाख, प्रभाग क्रमांक १६ ड अंतर्गत रस्ते कामाकरीता नाली व रस्ते कामाकरीता १ कोटी रुपयांच्या खर्चाच्या तरतूदीस मंजूरी बहाल करण्यात आली आहे..

## परभणी रेल्वे स्थानकावर अल्पवयीन मुलाची सुटका

**परभणी,/प्रतिनिधी-** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत १४ जुलै रोजी परभणी रेल्वे स्थानकावर एका अल्पवयीन मुलाची सुरक्षित सुटका करून बालसंरक्षणाबाबतची आपली संवेदनशीलता आणि तत्परता पुन्हा एकदा सिद्ध केली.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ जुलै रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास परभणी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर नियमित गस्त घालत असताना सहाय्यक उपनिरीक्षक भीमराव जोगदंड आणि सहाय्यक उपनिरीक्षक बी. व्ही. नलाबळे यांना एक अल्पवयीन मुलगा संशयास्पदरीत्या एकटाच फिरताना आढळून आला. त्यानंतर त्यांनी मुलाशी संवाद साधत प्राथमिक चौकशी केली व पुढील पडताळणीसाठी त्याला रेल्वे सुरक्षा बलाच्या परभणी पोस्टवर आणले. चौकशीदरम्यान संबंधित मुलाने आपले नाव आकाश (वय १६ वर्षे) असून तो तेलंगणा राज्यातील निजामाबाद येथील रहिवासी असल्याची माहिती दिली. तसेच कोणालाही न सांगता घरातून बाहेर पडल्याचेही त्याने सांगितले.

### 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत रेल्वे सुरक्षा बलाची तत्पर कारवाई; बाल कल्याण समितीकडे सुपूर्द

मुलगा अल्पवयीन असल्याचे लक्षात येताच आरपीएफने तत्काळ चाईल्ड हेल्पलाईन, परभणी यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर चाईल्ड हेल्पलाईनचे प्रतिनिधी यशवंत सोनकांबळे यांच्या उपस्थितीत मुलास बाल कल्याण समिती, परभणी यांच्यासमोर हजर करण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संबंधित अल्पवयीन मुलाला त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि पुढील संरक्षणात्मक कार्यवाहीसाठी योग्य पावतीसह बाल कल्याण समितीच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.

रेल्वे परिसरात आढळणाऱ्या हरवलेल्या, बेवारस किंवा असुरक्षित परिस्थितीतील मुलांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेचे रेल्वे सुरक्षा बल 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत सातत्याने कार्यरत असून, बालसुरक्षेबाबतची आपली बांधिलकी कायम ठेवत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत प्रगती कमी; १६ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व १६ बीएलओंना कारणे दाखवा नोटिसा

**परभणी,/प्रतिनिधी-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक मतदान केंद्रावरील गणना फॉर्म निर्धारित कालावधीत शंभर टक्के भरून घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे. या आढाव्यात काही सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कार्यक्षेत्रातील कामाची प्रगती अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील गंगाखेड, जिंतूर, परभणी आणि पाथरी विधानसभा मतदारसंघांतील प्रत्येकी चार अशा एकूण १६ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यामध्ये गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील बि. टी. बहिराम, संयजकुमार देशपांडे, शोयब खान आणि किरण सुरडवाड, जिंतूर विधानसभा मतदारसंघातील बी. एस. नांदापूरकर, उमेश ढाकणे, के. बी. जाधव आणि शितल कच्छवे, परभणी विधानसभा मतदारसंघातील डी. पी. कुपटेकर, तुकाराम कदम, गजानन जाधव आणि आवेज हाश्मी तसेच पाथरी विधानसभा मतदारसंघातील शौकत मुबारक पठाण, गोविंद कोल्हे, रमेश धोपे आणि अजित सुरवसे यांचा समावेश आहे.

याशिवाय कामातील अपुरी प्रगती लक्षात घेऊन १६ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनाही कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत. परभणी विधानसभा मतदारसंघातील कुंडलिक चोखोबा मुजमुले (भाग क्र. २३३), कांबळे जे. डी. (भाग क्र. १२४), सोमनाथ बोरामने (भाग क्र. २१८) आणि एन. बी. सोनटक्के (भाग क्र. १९०), जिंतूर विधानसभा मतदारसंघातील अब्दुल गफार जब्बार शेख (भाग क्र. ३०६), नागिले शंकर अण्णाराव (भाग क्र. ७६), एच. एस. खिरे (भाग क्र. ४२१) आणि भूरके के. पी. (भाग क्र. ३८), गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील श्रीरामे बालाजी तुकाराम (भाग क्र. ३९५), नागार्जन लक्ष्मणराव कनसे (भाग क्र. २२५), रामेश्वर सोपानराव भोसले (भाग क्र. ३४७) आणि समाधान बाबाराव गडदे (भाग क्र. ६१) तसेच पाथरी विधानसभा मतदारसंघातील एन. टी. वाघ (भाग क्र. १८८), गौरव जाधव (भाग क्र. ३०३), पवार दत्ता केशव (भाग क्र. ३६३) आणि नदीम अहमद रहीम खान (भाग क्र. ३६१) यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला खुलासा सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सर्व संबंधितांना एसआयआर कार्यक्रमास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून गणना फॉर्म शंभर टक्के भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि निर्धारित मुदतीत सर्व कामे पूर्ण करणे याबाबत काटेकोर कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

एसआयआर अभियानास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश....

जिल्हा प्रशासनाकडून एसआयआर अभियानाचा दैनंदिन आढावा घेतला जात असून, कामात हलगर्जीपणा किंवा विनाकारण विलंब आढळल्यास भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी निर्धारित वेळेत, अचूक आणि शंभर टक्के काम पूर्ण करून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले

# मनपा समाज कल्याण समितीच्या बैठकीत विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी

## टक्के राखीव निधीतून समाजमंदिरे, रस्ते, नाल्या, ज्येष्ठ नागरिक केंद्र व विद्यार्थी वसतिगृहासाठी महत्त्वाचे निर्णय

**परभण ,/प्रतिनिधी-:** महानगरपालिकेच्या गलिच्छवस्ती निर्मूलन व समाज कल्याण समितीच्या बैठकीत समाज कल्याण विभागासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीतून विविध विकासकामांच्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करून अनेक महत्त्वपूर्ण कामांना मंजुरी देण्यात आली.

समाजकल्याण समितीचे सभापती राजेश शंकरराव रणखांबे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. १६) महानगरपालिका सभापती दालनात बैठक पार पडली. बैठकीस उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे, नगरसचिव विकास रत्नपारखे, मुख्य लेखा अधिकारी डॉ. प्रकाश दासे, सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, लेखा अधिकारी अमोल सोळंके, समाज कल्याण अधिकारी राजकुमार जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विविध प्रभागांतील पायाभूत सुविधा, समाजमंदिरांची देखभाल, रस्ते, नाल्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणी यासंदर्भातील प्रस्तावांवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी प्रभाग क्रमांक ६ मधील रघूदाम सोसायटी येथे क्लब हाऊसचे बांधकाम व दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव नगरसेवक आकाश लहाने व मिलिंद बामणीकर यांनी मांडला. स्थानिक नागरिकांसाठी सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने मांडण्यात आलेल्या या प्रस्तावास समितीने मंजुरी दिली. प्रभाग क्रमांक १२ मध्ये सार्वजनिक शौचालय व उद्यान विकसित करण्याचा प्रस्ताव नगरसेवक बबलू घागरमाळे यांनी मांडला. नगरसेविका उषा अवचार यांनी या प्रस्तावास अनुमोदन दिले. नागरिकांच्या सोयीसाठी हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत अंतिम मंजुरीसाठी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. महानुभाव मठ परिसरात नाली बांधकाम करण्याचा प्रस्ताव चर्चेस आला असता, आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक बाबी अपूर्ण असल्याने हा प्रस्ताव सभागृहाने सर्वानुमते नामंजूर केला.

शहरातील विविध समाजमंदिरांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती, रंगरंगोटी आणि साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव नगरसेविका निर्मला वाघमारे तसेच नगरसेवक आकाश लहाने आणि मिलिंद घागरमाळे यांनी मांडला. समाजमंदिरे ही सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची केंद्रे असल्याने त्यांची सुरक्षितता आणि सुविधा वाढविणे आवश्यक असल्याचे मत सदस्यांनी व्यक्त केले. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

उपमहापौर गणेश देशमुख यांच्या पत्रानुसार प्रभाग क्रमांक १ मधील त्रिमूर्ती नगर येथील श्री साईबाबा मंदिर सभागृहात ज्येष्ठ नागरिकांसाठी करमणूक व विरंगुळा केंद्र सुरू करण्यासाठी हॉलची दुरुस्ती व अनुषंगिक कामे करण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला. नगरसेविका बेगम मोहसीन खान यांनी या प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी केली, तर मिलिंद घागरमाळे यांनी अनुमोदन दिले. ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक संवाद, वाचन आणि मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाल्यांचा सत्कार करण्याच्या प्रस्तावालाही समितीने मंजुरी दिली. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

बैठकीत प्रभाग क्रमांक १६ मधील अशोक आलने यांच्या घरापासून शेख नूर यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम व मजबुतीकरणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच प्रभाग क्रमांक १३ मधील रमाबाई आंबेडकर नगर येथील समाजमंदिराची देखभाल व दुरुस्ती करण्याचाही निर्णय घेण्यात आला. प्रभाग क्रमांक १५ मधील पवनपुत्र कॉलनी, खानापूर परिसरात विविध ठिकाणी नाली बांधकाम करण्याच्या प्रस्तावालाही सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या कामामुळे परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुलभ होऊन नागरिकांना दिलासा मिळणार आहे. याशिवाय प्रभाग क्रमांक ३ मधील भैय्यासाहेब आंबेडकर नगर समाजमंदिर परिसराचे सुशोभीकरण व गटार बांधकाम करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

बैठकीत ऐनवेळी आलेल्या विषयावर मुला-मुलींसाठी स्वतंत्र नवीन वसतिगृह उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून शासनाकडे बांधकामाचा प्रस्ताव पाठविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुसज्ज निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव पुढे पाठविण्यात येणार आहे.

बैठकीच्या शेवटी मुख्य लेखा अधिकारी डॉ. प्रकाश दासे आणि लेखा अधिकारी अमोल सोळंके यांनी समाज कल्याण विभागासाठी उपलब्ध निधी, त्याचे नियोजन आणि खर्चाबाबत माहिती दिली. समाज कल्याण अधिकारी राजकुमार जाधव यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा सादर केला. त्यानंतर मंजूर झालेल्या सर्व विषयांवर पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यास समितीने मान्यता दिली.

समाजमंदिरे व ज्येष्ठ नागरिक केंद्रासाठी महत्त्वाचे निर्णय...

समाज कल्याण समितीच्या बैठकीत शहरातील विविध समाजमंदिरांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती, रंगरंगोटी व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. तसेच प्रभाग क्रमांक १ मधील त्रिमूर्ती नगर येथे श्री साईबाबा मंदिराच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांसाठी करमणूक व विरंगुळा केंद्र सुरू करण्यासाठी हॉल दुरुस्ती व अनुषंगिक कामांना हिरवा कंदील देण्यात आला. या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक उपक्रमांसाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव...

बैठकीतील सर्वात महत्त्वाच्या निर्णयांपैकी एक म्हणजे मुला-मुलींसाठी स्वतंत्र नवीन वसतिगृह उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून शासनाकडे बांधकामाचा प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय. परभणी शहरात शिक्षणासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून त्यांना सुरक्षित व सुसज्ज निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रस्ताव पुढे पाठविण्यात येणार आहे. समाज कल्याण समितीच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या निवासाच्या प्रश्नाला दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## अग्रलेख

# झुरळांची चमकोगिरी

वैचारिक भूमिकेचा आणि विरोधासाठी आवश्यक असलेल्या ठोस मुद्यांचा पूर्णपणे अभाव असलेल्या विरोधकांना 'नीट'ची पेपरफूट आणि त्या मुद्यावर कॉक्रोच जनता पार्टीच्या पुढाकाराने झालेल्या आंदोलनाच्या निमित्ताने आयते कोलीत मिळाले. सरकारी यंत्रणेच्या सुस्तीमुळे ते त्यांना आयतेच दिले गेले असेही म्हणता येईल. नीटची पेपरफूट हा गंभीर विषय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह साऱ्यांनीच त्याचे गांभीर्य मान्य केले आहे. परंतु, या मुद्यावर संपूर्ण व्यवस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा आततायीपणा विरोधकांनी केला आणि त्यातून चिंताजनक वातावरण निर्माण झाले. विरोधक म्हणून सरकारवर टीका करण्याचा त्यांचा अधिकार मान्य केला तरी अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे चूकच म्हटले पाहिजे. आपण कुणाच्या सोबत आंदोलन करतो आहोत, यालाही महत्त्व असते. काल परवा आभासी जगतात जन्माला आलेल्या कॉक्रोच पार्टीसारख्या घटकाच्या मागे काँग्रेस आणि अन्य विरोधकांना फरफटत जावे लागले, याचे वैषम्य ज्याचे त्याला वाटायला हवे. पण, ते त्यांना वाटणार नाही. कारण सरकारशी संघर्ष करण्यासाठी विरोधकांकडे मुद्देच नाहीत आणि असतील तर त्या मुद्यांवर सरकारला जाब विचारण्याची त्यांची ताकद नाही. त्यामुळे आयत्या कोलितावर आपली पोळी भाजून घेण्याचा उद्योग विरोधकांनी केला.

गेल्या बारा वर्षांच्या काळात केंद्रातील मोदी सरकारने देशात फार मोठे मन्वंतर घडवून आणले आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती प्रतिकूल असताना आणि अंतर्गत आव्हाने असताना आपला देश प्रगतिपथावर अग्रेसर आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय भू-राजकीय स्थिती सतत बदलते आहे. तरीही आपले केंद्र सरकार वेळोवेळी योग्य भूमिका घेऊन राज्यशकट व्यवस्थित हाकत असल्याचे दिसत आहे. दुसऱ्या बाजूला विरोधकांचे राजकारण पाहिले, तर त्यांच्याकडे ठोस धोरणात्मक मुद्यांचा आणि वैचारिकतेचा पूर्ण दुष्काळ दिसतो. काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यासह शरद पवार, प्रियांका वढेरा, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, अरविंद केजरीवाल यांना कॉक्रोच पार्टीसारख्या क्षुल्लक घटकाच्या मागे धावावे लागले. विरोधकांची राजकीय आणि बौद्धिक दिवाळखोरी त्यामुळे दिसून आली. ज्या पक्षांना किंवा संघटनांना स्वतःची राजकीय ओळख नाही आणि ज्यांची राष्ट्रनिष्ठा संशयास्पद आहे, अशा उपटसुंभ घटकांनी गोंधळ घालावा आणि राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांनी राजकीय पोळी भाजण्यासाठी त्यांच्या खांद्यावर हात ठेवावा, हे चित्र लोकशाहीसाठी घातक आहे. या निमित्ताने जणू काही आभाळच कोसळल्याचे चित्र विरोधकांनी उभे केले. या सगळ्या राजकीय गदारोळाच्या आणि आंदोलनांच्या पाठीशी काही राष्ट्रविघातक, समाजकंटक किंवा देशात अस्थिरता निर्माण करू पाहणाऱ्या शक्ती असण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. अशांचा शोध घेऊन त्यांना कठोरपणे वठणीवर आणलेच पाहिजे. ते काम सरकार करीत आहेच. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलने ही मोठी ताकद आहे. आतापर्यंत विविध जनआंदोलनांनी व्यवस्थेला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले हेही खरे. मात्र, राष्ट्रविघातक घटक, राजकीय हस्तक्षेप यामुळे आंदोलने आपल्या मूळ ध्येयापासून भरकटल्याचीही उदाहरणे आहेत. नीट परीक्षेतील गैरप्रकाराविरुद्धचे आंदोलन न्याय्यच होते. पण, ते आंदोलन विकसित होत असताना सरकारचा विरोध हा एकमेव अजेंडा असलेले काही लोक त्यात घुसले. त्यामुळेच त्यात अप्रिय घटना घडल्या. देशविरोधी नारेबाजी झाली. आंदोलनाचा खरा उद्देश अशा घटनांनी बाधित होतो. पण, ते लक्षात येते तेव्हा उशीर झालेला असतो. या विषयाला आणखी एक बाजू आहे. ती अशी की, अशा अत्यंत संवेदनशील मुद्यावर देशातील सामान्य नागरिक, पालक आणि विद्यार्थी रस्त्यावर उतरतात, तेव्हा त्या सर्वांनाच सरसकट 'अजेंडावाले' ठरवणे ही अत्यंत धोकादायक मानसिकता आहे. सत्तेला प्रश्न विचारणे किंवा सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करणे हे लोकशाहीत 'नॉर्मल' मानले पाहिजे. त्यामागे असलेल्या खऱ्या अजेंड्याचा शोध घेणे आणि खऱ्या विघातकांना वठणीवर आणणे आवश्यकच आहे. पण, सरसकट सर्वांवर शिक्का मारण्याची आवश्यकता नसते. लोकशाही ही अशीच अस्वस्थ असते आणि तिच्या तशा असण्यातच तिची मातब्बरी असते. जगातील सर्वांत मोठ्या लोकतांत्रिक देशात आपण राहतो. हा देश जगाला आदरणीय असलेल्या वैविध्यांनी नटलेला आहे. त्यामुळे स्वाभाविकच त्यात सहमती-असहमती असणार. असहमत किंवा विरोधात असलेल्या प्रत्येकाच्या कपाळावर शिक्का मारण्याची घाई करणे लोकतांत्रिक परंपरेला साजेसे नाही. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते तेव्हा संयम हाच उपाय असतो. संयमी संवादातून सुटू शकणार नाही, असा प्रश्नच आतापर्यंत जन्माला आलेला नाही. मात्र, काही उठवळ आणि बाष्कळ मंडळी इतिहासातील भलतेच दाखले देऊन विरोधकांना भांडवल करण्याची संधी देणारी उथळ विधाने करीत असतात. त्यांच्या त्या विधानांमुळे संवादातून समस्या सुटण्याचे मार्ग बंद होत असतात. यापूर्वीही देशात अनेकदा स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटले. अनेक मोठे घोटाळे झाले. पण म्हणून काही संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली नाही. अशा वेळी अत्यंत संयमाने, वेगाने आणि कठोर पावले उचलून पुढील नुकसान टाळणे हे संवेदनशील सरकारचे कर्तव्य असते. ते नीटच्या पेपरफुटीबाबत योग्यरीत्या केले गेले. संवादाच्या आघाडीवरही सरकारला अधिक वेगाने काम करता आले असते. आंदोलनाची घोषणा होताच संवादाची प्रक्रिया सुरू व्हायला हवी होती. ते झाले असते तर एवढा गदारोळ झाला नसता आणि झुरळांच्या बगलबच्च्यांना चमकोगिरीची संधी मिळाली नसती. आपण आधीच्या सरकारपेक्षा वेगळे आहोत, असे काही लोक एकीकडे सांगत असतात आणि दुसरीकडे पूर्वीच्या सरकारांच्या काळातील घटनांशी वर्तमानाची तुलना करीत असतात ही विसंगती आहे. आपण वेगळे आहोत, असा आपला दावा असेल तर ते वेगळेपण दिसायलाही हवे. भारताचे दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी एक अतिशय मार्मिक विधान केले होते. ते म्हणाले होते- ''सरकारे सब समान होती हैं, फर्क चरित्र एवं संस्कार का होता हैं...'' अटलजींचे हे शब्द प्रत्येक सरकारने लक्षात ठेवायला हवेत. या अनुषंगाने संवादासाठी पुढाकार घेऊन आपण पूर्वीच्या सरकारपेक्षा वेगळे आहोत, हे दाखवून देण्याची संधी सरकारने गमावली आणि त्यामुळे भलत्यांनाच हिरोगिरीची संधी मिळाली, याची येथे वैषम्यासह नोंद केली पाहिजे. सरकारवर विरोधकांच्या तुलनेत अधिक जबाबदारी असते. त्यांना विचार, विवेक, लोकभावना आणि व्यवहार यांची सांगड घालावी लागते. विरोधकांवर तशी फार काही जबाबदारी नसते. सरकारने सदैव सावध असायला हवे. लोकशाही केवळ बहुमताच्या किंवा प्रशासकीय अधिकारांच्या जोरावर चालत नसते. ती विश्वासाच्या धाग्यावर आणि संवादाच्या चाकांवर चालते. सत्ता आणि विरोध ही लोकशाहीच्या एका रथाची दोन चाके आहेत. पंतप्रधान मोदी यांनी नीटच्या पेपरफुटीच्या अनुषंगाने जाहीर वक्तव्य करून विद्यार्थ्यांना आश्वस्त केले. पण, संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी प्रतिबंधक उपाय म्हणून काय केले, हा प्रश्न उरतोच. पोलिस किंवा अन्य यंत्रणा सरकारच्या अधिकारात असतात. त्यांना आंदोलन हाताळण्याची नव्हे तर कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी द्यायची असते. आंदोलन हाताळण्यासाठी सरकारच्या वतीने पुढाकार घेतला जायला हवा. ते न घडल्यामुळे कॉक्रोच उपाख्य झुरळांचे फावले. भलत्यांनाच चमकोगिरीची संधी मिळाली. आंदोलन झाले, पण फलित काय, हा प्रश्न शिल्लकच आहे. तो लवकर सुटावा आणि भविष्यात झुरळांना अशा विषयांपासून दूर ठेवण्याची काळजी घेतली जावी, एवढीच अपेक्षा आहे. ■


## तंत्रवेध

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एकेकाळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लॅस्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता राहत नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पृष्ठभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. ग्रामीण भारतासाठीही ही सुविधा अत्यंत महत्त्वाची आहे. आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि



पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्डे सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात. या तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पर्यावरण संवर्धन. दरवर्षी कोट्यवधी प्लॅस्टिक डेबिट आणि क्रेडिट कार्डे तयार केली जातात. कार्ड्सचा वापर कमी झाल्यास प्लॅस्टिक कचऱ्यात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करीत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील. एखाद्या दिवशी ग्राहकाला एटीएमसमोर उभे राहून आपल्या मातृभाषेत सूचना ऐकून किंवा बोलून व्यवहार पूर्ण करता येईल. अशा प्रकारे तंत्रज्ञान अधिक मानवी आणि सर्वसमावेशक बनत जाईल. तथापि, या सुविधेचा वापर करताना काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. मोबाईल सुरक्षित ठेवणे, यूपीआय पासवर्ड कोणालाही न सांगणे, अनोळखी व्यक्तींच्या मदतीवर अवलंबून न राहणे आणि व्यवहार पूर्ण झाल्यानंतर सूचना तपासणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान जितके प्रगत होते तितकी जागरूकताही आवश्यक असते. एकंदरीत पाहता, कार्डलेस एटीएम ही केवळ पैसे काढण्याची नवी पद्धत नाही, तर भारताच्या डिजिटल परिवर्तनाचे प्रभावी प्रतीक आहे. यामुळे बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित, सुलभ, पर्यावरणपूरक आणि सर्वसमावेशक होत आहेत. जगाला डिजिटल पेमेंटची दिशा दाखवणाऱ्या भारताने आता रोख रक्कम वितरणाच्या क्षेत्रातही नवा मानदंड निर्माण केला आहे. डिजिटल भारताच्या प्रवासात कार्डलेस एटीएम हे सामान्य नागरिकाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी आणणारे पाऊल असून आर्थिक सक्षमीकरणाला नवी गती देते. आगामी काळात ही सुविधा भारतातील प्रत्येक गाव, प्रत्येक शहर आणि प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनेल, यात कोणतीही शंका नाही. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# सहज मिळतेय, पण सांभाळून!

सहज मिळत असेल आणि वारंवार एखाद्या गोष्टीसाठी पिच्छा पुरविला जात असेल तर मानवी स्वभावच असा आहे की, तो बळी पडतोच! मात्र, नंतर यातून वाट्याला येणारा मनःस्ताप वैताग आणणाराच नव्हे, तर का ही दुर्बुद्धी सुचली, अशा मानसिकतेत माणसाला नेणारा असतो. खाजगी फायनान्स कंपन्या, डिजिटल कर्ज देणारे ॲप्स यांच्याकडून सहज उपलब्ध होणारे कर्ज तेव्हा समाधान देणारे असते; मात्र नंतर होणारी 'पठाणी' वसुली अवघड जागेचे दुखणे म्हणूनच सहन करावे लागते. तेव्हा कळतं सहज मिळणाऱ्या गोष्टीत समाधान नसतं म्हणून!

'कर्ज' हा प्रत्येक सामान्य माणसाच्या जगण्याचा आधार आहे. कर्ज काढून समाधानाने जगणारी अनेक कुटुंबे आपण पाहतो. मात्र अशा कुटुंबांना आधी कर्ज घेताना कमालीच्या क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागते. एक व्यवस्था या विरुद्धही आहे. जेथे अगदी सहज, कोणत्याही कागदपत्रांची फारशी खातरजमा न करता कर्ज उपलब्ध करून देण्याची सोय केली जाते आणि ते म्हणजे खाजगी फायनान्स कंपन्या व आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात तयार झालेले कर्ज देणारे डिजिटल ॲप्स! खरं तर नियम, कायद्याची बंधने सगळ्यांसाठीच आहेत. मोठमोठाल्या बँकांनाही आणि खाजगी फायनान्स कंपन्यांनासुद्धा. पण ते पाळायचे की नाही, हा ज्याचा त्याचा विषय असल्याचेच चित्र सध्या आहे.

एरवी राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज घेताना जीव मेटाकुटीस येईल एवढी चौकशी आणि कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागते; पण हा त्रास तेवढ्यापुरताच! नंतर मात्र सर्वकाही निवांत चालते. खाजगी फायनान्स कंपनीचे आणि डिजिटल ॲप्सचे जरा वेगळेच आहे. ते कर्ज घ्या म्हणून तुमचा एवढा पिच्छा पुरवितात की, जेवढं बोलणं कुटुंबातील सदस्यांसोबत होत नसेल, तेवढा संवाद कंपनीवाले आपल्याशी करतात. वेळ-काळाचे भान नाही. रात्री १० वाजो की ११ त्यांचे फोन येणार! मॅसेज तर सांगूच नका... अतिरेक म्हणजे आपण कोणत्याही प्रकारचा कर्जासाठी 'अर्ज' केला नसेल तर तो 'अप्रुव्ह' म्हणजेच मान्य झाल्याचे मॅसेज करून कंपन्या मोकळ्या होतात. अनेक नावाजलेल्या फायनान्स कंपन्यांही याच पद्धतीने वागतात. बरेचदा पाठपुराव्यासाठी दाखविल्या जाणाऱ्या सततच्या जाहिरातींना प्रभावित होऊन अनेक जण बळी पडतात आणि 'कर्जबाजारी' होतात.

आणि एकदा का आपण कर्ज घेतलं की, खाजगी कंपन्यांची भाषा आणि व्यवहार बदलतात. ही कोणत्याही एका नव्हे, तर सर्व कंपन्यांची रीत आहे. कुणाचे सुख-दुःख यांना कळत नाही की दिवस-रात्रीचे भान राहत नाही. सुटीचे आणि कामाच्या दिवसांचाही यांना विसर पडतो. त्यांना केवळ अगदी सहजतेने कर्ज म्हणून दिलेले पैसे 'वसुली' करण्याची धुंद चढलेली असते. त्यावेळी कळते अगदी सहज मिळालेल्या गोष्टी चिरकाल समाधान देऊ शकत नाही, हे नक्की!

आज अशा खाजगी फायनान्स कंपन्यांचे जाळे प्रचंड वाढले आहे. सहज मिळणाऱ्या कर्जाच्या भानगडीत आम्ही स्वतःच स्वतःची फसवणूक करून घेत आहोत. डिजिटल कर्ज ॲपच्या माध्यमातून युवा पिढी आपले लहान-मोठे खर्च भागविण्याच्या विचाराने याला बळी पडून नंतर प्रचंड मनःस्तापाचा बळी ठरताना दिसत आहेत. यातून डिजिटल गुन्हेगारीही वाढत चालली आहे. पठाणी वसुलीसाठी अगदी सर्व मर्यादा ओलांडण्याचे प्रकार डोळ्यादेखत घडत असूनही यावर अंकुश कुणाचा हा प्रश्न कायम असेल तर मात्र क्षणिक समाधानात तथ्य काय, असाच प्रश्न पडतो.

नियम मोठ्या पतपेढ्यांना आहेत, तसेच याही संस्थांना आहेत. सकाळी ८ ते संध्याकाळी ७ पर्यंतच फोन किंवा भेटून वसुलीसाठी संपर्क करावा, असे आहे. पूर्वसूचना देऊनच कर्जदाराकडे जाण्याचे निर्देश आहेत. धमक्या किंवा शिवीगाळ करून वसुली करू नये, अशा रिझर्व्ह बँकेच्या सूचना असतानाही त्या पाळल्या जात नाहीत, हे वास्तव आहे. कर्ज वसुलीसाठी घरावर आलेला फायनान्स कंपनीचा माणूस अनेकदा अपमानजक वागणूक देऊन जातो. अशावेळी ते सुरुवातीचे क्षणिक समाधान नकोसे वाटते. आज सहज कर्ज उपलब्ध होण्याच्या नादात आम्ही अशा कंपन्यांच्या 'मार्केटिंग' कौशल्याचे बळी ठरतो आणि समाधान गमावून बसतो. एकाला अनुभव येऊनही जर शेजारचा त्याच मार्गाने जाणार असेल तर सहज उपलब्ध होत असल्याने ते स्वीकारण्याची मानसिकता बदलावी लागणार आहे. नाहीतर हे रडगाणे न संपणारे असेच असेल! ■

९७६३७१३४१७

## दिल्ली वार्तापत्र

# काँग्रेसचे आत्मघातकी पाऊल

**श्यामकांत जहागीरदार**

नीट परीक्षेतील गैरव्यवहार आणि आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ राजधानी दिल्लीत एकाच वेळी दोन आघाड्यांवर आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची पहिली आघाडी ही जंतरमंतरची आहे. याठिकाणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी अभिजित दीपके यांच्या नेतृत्वातील कॉक्रोच जनता पार्टीतर्फे आंदोलन सुरू आहे. आंदोलनाची दुसरी आघाडी मंगळवारी काँग्रेसने उघडली.

लडाखमधील पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक जंतरमंतरवरील आंदोलनात उतरल्यानंतर आणि त्यांनी बेमुदत उपोषण सुरू केल्यानंतर आंदोलनाचे गांभीर्य काही प्रमाणात वाढले. सुरुवातीला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनीही या आंदोलनाची पाहिजे तशी दखल घेतली नाही. बेमुदत उपोषणाचे तीन आठवडे उलटून गेल्यानंतर वांगचुक यांची प्रकृती खालावू लागली, त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि वैद्यकीय सल्ल्याने पोलिसांनी वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात हलवले.

मानवीय भूमिकेतून पोलिसांची ही कारवाई योग्य अशीच म्हणावी लागेल. पण स्वतःला वांगचुक यांचे हितचिंतक म्हणवणाऱ्या पण प्रत्यक्षात त्यांचे हितचिंतक नसणाऱ्या राजकीय पक्षांच्या लोकांनी आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या या कारवाईवर आक्षेप घेतला. बळाचा वापर करत पोलिसांनी वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केले, असा या लोकांचा आरोप होता. उपोषण करताना वांगचुक यांनी आपले प्राण गमवावे, असे तर त्यांच्या कथित समर्थकांना अपेक्षित नव्हते, असा प्रश्न यातून पडतो.

सोनम वांगचुक यांना रुग्णालयात हलवल्यानंतर त्यांच्या जागेवर कॉक्रोच जनता पार्टीचे नेते दीपके उपोषणाला बसले. पण बेमुदत उपोषण करणे हे रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याइतके सोप नसल्याचे त्यांच्या लक्षात आले, त्यामुळे अडीच दिवसातच त्यांनी आपले उपोषण गुंडाळले. राहुल गांधी यांना दुसऱ्या कोणत्याही शत्रूची गरज नाही, तेच स्वतःचे सर्वांत मोठे शत्रू असल्याचे विधान दीपके यांनी केले होते. यामुळे राहुल गांधी आणि काँग्रेस कार्यकर्ते नाराज झाले आणि त्यांनी या आंदोलनापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच वांगचुक बेमुदत उपोषणाला बसले असतानाही राहुल गांधी त्यांना भेटायला गेले नाहीत. एका जुन्या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर सोनिया गांधींच्या पुढाकारानंतर काँग्रेसने पवन खेरा यांना जंतरमंतरवर सोनम वांगचुक यांच्या भेटीसाठी पाठवले.

मुळात काँग्रेस दीपकेंकडे राहुल गांधींचा मुख्य राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून पाहू लागली होती, असे वाटते.दीपके जेवढे मोठे होतील, तेवढे राजकारणातील राहुल गांधींच्या स्थानाला धक्का बसेल, असे काँग्रेसला वाटू लागले. त्यामुळे या मुद्यावर नेमकी कोणती भूमिका घ्यावी, हे काँग्रेस नेत्यांना समजत नव्हते. सोमवारी आंदोलक विद्यार्थ्यांच्या संसद मार्चला जो प्रतिसाद मिळाला, तो पाहून काँग्रेस नेत्यांच्या तोंडचे पाणी पळाले. सोमवारी दिवसभर देशातील सर्व माध्यमात या आंदोलनाची चर्चा होती. अशा परिस्थितीत राहुल गांधींचे काय, असा प्रश्न काँग्रेसला पडू लागला. यातूनच तरुणांचे हे आंदोलन हायजॅक करण्याचा विचार काँग्रेस नेत्यांच्या मनात आला. त्यातूनच ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर धरणे देण्याची कल्पना पुढे आली. या योजनेचा सुगावा दिल्ली पोलिस आणि गुप्तचर संस्थांना लागला नाही, ही वस्तुस्थिती होती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका वढेरा, वेणुगोपाल, काँग्रेसचे खासदार आणि अन्य नेते मोर्चाने ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर पोहाचले आणि त्यांनी धरणे आंदोलन सुरू केले.

पंतप्रधानांच्या निवासस्थानाचा परिसर हा अतिसंवेदनशील भाग असतो. त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे आंदोलन करू नये, हा संकेत आहे. तुम्हाला आंदोलनच करायचे असेल तर दिल्लीत अनेक ठिकाणी करता येते. जंतरमंतर तर आंदोलनासाठी राखीव क्षेत्र आहे. संसद भवन परिसरातही तुम्ही धरण्यावर बसू शकता. काँग्रेस नेते आणि कार्यकर्त्यांपासून पंतप्रधानांच्या जिवाला धोका पोहोचण्याची शक्यता नव्हती, पण या आंदोलनात काही असामाजिक तत्त्व घुसले असते, तर कोणता अनुचित प्रसंग घडला असता, याची कल्पना करता येत नाही. अगदी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीहल्ला करावा लागला असता, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या असता, तर काय बिकट प्रसंग ओढवला असता, याची कल्पनाही करवत नाही.

भाजपा विरोधी पक्षात असताना त्याने सरकारविरुद्ध अनेक आंदोलने केलीत, पण पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर कधीही आंदोलन केले नाही. जे पथ्य आणि संकेत विरोधी पक्षात असताना भाजपा पाळत होती, तेच पथ्य आणि संकेत काँग्रेसनेही पाळले पाहिजे. राहुल गांधी नादान असतील, पण सोनिया गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी हे भान ठेवायला पाहिजे होते. खडगे राजकारणातील सर्वांत ज्येष्ठ, संयमी आणि अनुभवी नेते आहेत, त्यांनाही याचे भान राहिले नाही आणि ते राहुल गांधींमागे फरफटत गेले, याचे आश्चर्य वाटते. राहुल गांधी ५६ वर्षांचे झाले तरी अजूनपर्यंत स्वतःला युवा समजतात, त्यामुळे त्यांच्या वागण्यातही अनेकदा बालिशपणा दिसून येतो. पण खडगे तुम्हीसुद्धा.. असे म्हणावे वाटते. मोदी सरकार आणि दिल्ली पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळली म्हणून बरे झाले.

सरकारने राहुल गांधींशी चर्चा करण्यासाठी, त्यांना समजवण्यासाठी केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांना पाठवले, पण राहुल गांधी ऐकायला तयार नव्हते. राजकीय नेत्यांनी आपल्या शब्दावर कायम राहायला पाहिजे, संसदेत विद्यार्थ्यांच्या मुद्यावर चर्चा घडवावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून सरकार संसदेत चर्चा करायला तयार असल्याचे आश्वासन डॉ. जितेंद्रसिंह यांनी त्यांना दिले. सरकारच्या या आश्वासनानंतर राहुल गांधी यांनी आपले धरणे आंदोलन मागे घ्यायला पाहिजे होते, पण त्यांनी तसे केले नाही. देशातील जनतेचा राहुल गांधींवर विश्वास नाही, याचे कारण हेच आहे. तुम्ही सरकारसमोर एक मागणी ठेवली आणि सरकारने तुमची मागणी मान्य केली तर तुम्ही आपले आंदोलन मागे घ्यायला पाहिजे होते, राजकीय शहाणपणा यातच असतो. पण राजकीय शहाणपणा आणि राहुल गांधी यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध आहे, असे मंगळवारच्या घटनेवरून तरी वाटले नाही. पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करून राहुल गांधी यांनी देशातील कॅमेऱ्यांचा झोत काही तासासाठी स्वतःकडे वळवत प्रसिद्धी मिळवली असली, तरी यातून त्यांनी आपले कायमस्वरूपी नुकसान करून घेतले आहे. अराजकतावादी नेता असे त्यांना म्हटले जात होते, पण मंगळवारच्या घटनाक्रमाने त्यांनी स्वतःच यावर शिक्कामोर्तब करून घेतले. 'विनाशकाले विपरीत बुद्धी' यापेक्षा यावर आपण जास्त तरी काय म्हणणार? ■

९८८१७१७८१७

### मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यात तथ्य

'फेसलेस आंदोलनातून अराजकता माजवण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री' ही बातमी तरुण भारतात वाचली. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यात तथ्य आहे. या 'विद्यार्थी' आंदोलनामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पेपरफूट भारतात प्रथमच झाली आहे का? काँग्रेस काळात किती वेळा पेपरफूट झाली होती आणि प्रत्येक वेळी तत्कालीन काँग्रेस/आघाडी सरकारने कधी जबाबदारी स्वीकारली? हे आंदोलन आणि नंतरचा हिंसाचार पूर्वनियोजित होता का? भारताच्या विकासाच्या आड येणाऱ्या देशाबाहेरील काही हितशत्रूंनी, भारतातील विरोधी पक्षांशी संगनमत करून भारतविरोधी कारस्थान केले आहे का? या आंदोलनाचा फायदा घेऊन कोणीतरी, भारतात अराजकता, हिंसाचार पसरवून, भारताचा नेपाळ आणि बांगलादेश करण्याचा डाव आखला होता का? २००७ मध्ये केंद्रात आघाडी सरकार असताना सोनम वांगचुकना लेह पोलिसांनी विदेशी फंड घेण्याबद्दल नोटीस बजावली होती का?

सोनम वांगचुक, अभिजित दीपके आणि त्याचे आम आदमी पार्टी तसेच अमेरिका कनेक्शन काय आहे? दीपके कोण आहे आणि आताच त्याला भारतात येऊन आंदोलन करण्याची तातडी का भासली? त्याला अमेरिकेतून भारतात कोणी बोलावले? त्याचा खर्च कोण करत आहे? या आंदोलनासाठी अर्थपुरवठा कोण करत होते?

महत्त्वाचे म्हणजे दिल्लीतील यूएस दूतावासाने दिल्लीत २० जुलै रोजी होऊ घातलेल्या हिंसक आंदोलनावर १७ जुलैलाच 'एडव्हायजरी' प्रसिद्ध कशी केली? शांततापूर्ण असलेल्या आंदोलनाला, संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणाऱ्या दिवशीच, २० जुलैला हिंसक वळण का लागले? तेथे ट्रक भरून दगड कोणी आणि कसे आणले? जंतरमंतरवर आंदोलनस्थळी जायचे सोडून राहुल गांधींनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर अचानक धरणे आंदोलन का केले? हे आंदोलन 'चालवण्यात' आम आदमी पक्षाचा नक्की उद्देश काय आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे. तेव्हा केंद्र सरकारने या आंदोलनाशी परोक्ष किंवा अपरोक्ष संबंध असलेल्या सगळ्यांची कसून चौकशी करून दोषींना न्यायालयात उभे केले पाहिजे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### अंधारातून प्रकाशाकडे नेणारे गुरुतत्त्व!

यावर्षी गुरुपौर्णिमा महोत्सव २९ जुलैला आहे. गुरुपौर्णिमा हा शिष्यासाठी सर्वांत मोठा सण आहे. ज्या गुरूंनी आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेले, मोक्षाचा मार्ग दाखवला आणि आपला हात धरून आपल्याला सन्मार्ग दाखवला, त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. यादिवशी आपण गुरू-शिष्य परंपरेचे जनक असलेल्या आदि गुरू महर्षी व्यास यांचे पूजन करतो. त्यामुळेच गुरुपौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा', असेही म्हणतात.

जीवनात प्रत्येक क्षेत्रात गुरू हवा असतो. आध्यात्मिक प्रगतीसाठी अनेक जण अध्यात्मातील थोर व्यक्तीला गुरू मानतात आणि त्यांच्याकडून गुरुमंत्र घेऊन साधनेला प्रारंभ करतात. शालेय शिक्षक, तसेच सृष्टीतील सजीव-निर्जीव



वस्तूंकडूनही आपण बरेच काही शिकू शकतो. झाडे त्यांचे काम निःस्वार्थीपणे करत असतात. त्यांच्याकडून निःस्वार्थपणा शिकू शकतो. मुंग्या एकजूट होऊन काम करीत असतात. त्यांच्याकडून संघटितपणा शिकू शकतो. गुरू ही एक आध्यात्मिक शक्ती आहे. त्यामुळे गुरू हा केवळ गुरुमंत्र देऊन साधना करून घेणाराच नसावा, तर तो निःस्वार्थी, योग्य मार्ग दाखवणारा, त्याच्या शिष्यांना भावसागरातून तारणारा, संकटमुक्त करणारा आणि शेवटी शिष्याला जीवनमुक्त करणारा असावा. गुरू असेल, तरच शिष्य घडतो आणि शिष्य घडला की, समाज घडतो. त्यामुळेच गुरुपौर्णिमा या पवित्र दिवशी आपण आपल्या सर्व गुरूंना मनापासून वंदन करूया.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

### लोकसभा की क्रोध सभागृह?

लोकशाहीमध्ये राज्यसभा आणि लोकसभा ही दोन महत्त्वाची सभागृहे आहेत. परंतु लोकसभा, विरोधी पक्षांनी क्रोध सभागृह करून टाकले आहे. लोकांच्या, देशाच्या हितासाठी विचारविनिमय शांतता राखून करण्यासाठी ते निर्माण झाले परंतु विरोधी पक्षांनी या सभागृहाचे युद्धभूमीत रूपांतर करून टाकले. विरोधी पक्षाने या सभागृहाचे पावित्र्य भंग करून लोकशाहीचा अपमान केला आहे. ज्यानी भारतात संविधानाची निर्मिती केली त्याचाही अपमान विरोधी पक्ष करीत आहे, असे चित्र समोर दिसत आहे. जेथे लोकांच्या हिताचे निर्णय होतात, तेथे तरी नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. पण विरोधी पक्ष आज स्वतःची जबाबदारी विसरल्यासारखा वागत आहे. राज्यसभा आणि लोकसभेचे पावित्र्य कायम राहावे, हीच अपेक्षा. ■

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जालना महानगराच्या वतीने भव्य रक्तदान

# समाजसेवाच फडणवीस यांच्या कार्याची खरी ओळख-भास्कर आबा दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे लोकप्रिय व विकासाभिमुख मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील चार ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मंडळ अध्यक्ष महेश निकम (मुक्तेश्वर लॉन्स, जुना जालना), सुनील खरे (बाथ्री तेली पंचायत भवन, नवीन जालना), अमोल धानुरे (रुपम हॉल, पूर्व जालना) आणि संजय डोंगरे (रामनगर सा.का., ग्रामीण) यांच्या नेतृत्वाखाली शहरातील चार ठिकाणी रक्तदान शिबिरे उत्साहात पार पडली. या शिबिरांमध्ये नागरिक, युवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एकूण २३५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा






प्रेरणादायी संदेश दिला. यावेळी बोलताना भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नेहमीच समाजहिताला प्राधान्य देत विकासाभिमुख आणि जनकल्याणकारी शासन दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापेक्षा समाजोपयोगी उपक्रम राबविणे हेच त्यांना खरी शुभेच्छा, रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून समाजसेवा हेच आपले प्रमुख ध्येय मानणारी संघटना आहे आणि अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजाप्रती आपली बांधिलकी कायम जपली जाईल. या रक्तदान शिबिराला कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संक्षिप्त

### मासेमारी करणाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून छळ; उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे न्यायासाठी साकडे!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

वाकडी, करजखेडा, सेलू, गोगलगाव आणि मानवत परिसरातील कायदेशीररीत्या मासेमारी व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या मासेमारांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांचा मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ केला जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पीडित मासेमारांनी परतूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी साहेबांना निवेदन देऊन सखोल चौकशीची आणि न्यायाची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित मासेमार हे मौजे वाकडी, करजखेडा, सेलू, गोगलगाव व मानवत परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून कायदेशीर मार्गाने मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा सांभाळ करत आहेत. परंतु, सन २०२५ पासून काही व्यक्तींनी संगनमत करून त्यांचा व्यवसाय बंद पाडण्याच्या दुष्ट हेतूने बनावट आणि खोट्या तक्रारी देण्यास सुरुवात केली आहे. परतूर पोलीस ठाण्यात कोणताही वस्तुनिष्ठ पुरावा किंवा पंचनामा नसताना खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर, शिवीगाळ करणे, मारहाण करणे, दमदाटी करणे आणि जीवे मारण्याच्या धमक्या देणे अशा प्रकारांनाही मासेमारांना सामोरे जावे लागत आहे.

काही मत्स्य व्यवसाय संस्थेचे अध्यक्ष, सचिव आणि इतर काही व्यक्तींनी संगनमत करून खोट्या तक्रारी दिल्या आहेत. संबंधित व्यक्तींशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता उलटा 'भिंत फोडल्याचा' बनावट गुन्हा दाखल करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. या सततच्या त्रासामुळे सर्व पीडित कुटुंबांमध्ये भीतीचे सावट पसरले असून त्यांच्या उपजीविकेवर गंभीर गदा आली आहे.

परतूर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक २७८/२०२६ मध्ये खालील नागरिकांची नावे खोट्या तक्रारींआधारे समाविष्ट करण्यात आली आहेत: शेषराव लक्ष्मण परसे (रा. वाकडी, ता. मंठा, जि. जालना), अंकूश लक्ष्मण परसे, लहु लक्ष्मण परसे, संतोष भागवत परसे, रंगनाथ रामभाऊ कुटारे, राहुल हिरामण कुटारे, सुदाम भागवत परसे आदींचा समावेश आहे. सदर प्रकरणी वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी, खोट्या तक्रारी देऊन अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांवर आणि संगनमत करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी नम्र विनंती अर्जदार शेषराव लक्ष्मण परसे व इतर ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडे केली आहे.

### विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, वीरपत्नी व पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अतिउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, वीरपत्नी तसेच त्यांच्या पाल्यांना सन २०२५-२६ या वर्षासाठी एकरकमी १ लाख ते २ लाख रुपयांपर्यंत 'विशेष गौरव पुरस्कार' देण्यात येणार आहेत. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पुरस्कारासाठी शैक्षणिक, क्रीडा, कला, सामाजिक कार्य, उद्योग, पर्यावरण तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याचा विचार करण्यात येणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील पात्रता : इयत्ता दहावीमध्ये किमान ९० टक्के व बारावीमध्ये किमान ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेले माजी सैनिक किंवा वीरपत्नींचे पाल्य पात्र राहतील. तसेच पदवी किंवा पदव्युत्तर परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविलेला किंवा खखढ, खखचू, -खखचड यांसारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाही या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे.

## विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ मंठा बंद; वंचित बहुजन आघाडीची निषेध रॅली



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर मंठा तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मंठा बंद पाळण्यात आला तसेच शहरातून निषेध रॅली काढण्यात आली.

रॅलीदरम्यान कार्यकर्त्यांनी न्याय द्या, न्याय द्या... विद्यार्थ्यांना न्याय द्या अशा जोरदार घोषणा देत विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणारा अन्याय थांबवावा, अशी मागणी केली.

या बंदला मंठा शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली. आंदोलन शांततापूर्ण वातावरणात पार पडावे यासाठी पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दिवसभर आंदोलन शांततेत पार पडले.यावेळी डॉ. किशोर त्रिभुवन,पुरुषोत्तम देशमुख, सुभाष जाधव,आशिष मोरे, रमेश प्रधान, रमेश जाधव, सुधाकर जाधव,उद्धव सरोदे, साईनाथ मोरे,भगवान हिवाळे, दिलीप हिवाळे,प्रसाद वाहुळे, राजू जाधव,अमोल जाधव,आदर्श जाधव,ऋषी जाधव,सुधाकर खरात, अमोल कामिटे,एकनाथ मानकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## लोकशाहीच्या बळकटीसाठी पात्र मतदारांनी एसआयआर प्रक्रियेत सहभागी व्हावे- विष्णु पाचफुले

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदार यादी अचूक आणि अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली सध्या सुरू असलेल्या मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) अभियानात शहरातील सर्व पात्र नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी केले आहे.

मतदार यादीतील नाव नोंदणी, दुरुस्ती किंवा इतर तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी आज गुरुवार दि. २३ जुलै रोजी प्रभाग क्रमांक ८ चे बीएलओ श्री. वाघ यांच्या उपस्थितीत एसआयआर प्रक्रिया औपचारिकरित्या पूर्ण केली. यावेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ पदाधिकारी तथा उपशहरप्रमुख प्रकाश घोडे हेदेखील उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना विष्णू पाचफुले म्हणाले की, मतदानाचा अधिकार हा आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. नव्याने १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवक-युवतींनी, तसेच ज्यांचे नाव मतदार यादीत नाही, अशा सर्व पात्र नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा. केवळ स्वतःचेच नाही, तर आपल्या घरातील प्रत्येक पात्र सदस्याचे नाव यादीत असल्याची खात्री करून घ्यावी. निवडणूक आयोगाच्या या उपक्रमाला यशस्वी करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. कोणाचे नाव वगळले गेले असेल, पत्ता बदलला असेल किंवा इतर दुरुस्त्या करायच्या असतील, तर त्वरित जवळच्या मतदान केंद्रावर जाऊन किंवा बीएलओ श्री. वाघ यांच्याशी संपर्क साधून या प्रक्रिया विनाविलंब पूर्ण कराव्यात.

जालना मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाने या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा आणि एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, उपशहरप्रमुख प्रकाश घोडे यांनी केले आहे.

## वारकऱ्याचा वेश धारण करून फिरणारा आरोपीला अटक; परतूर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतूर पोलिसांनी खून, दरोडा व जीवघेणा हल्ला प्रकरणातील फरार आरोपीला वारकऱ्याचा वेश धारण करून अटक करत विशेष कामगिरी बजावली आहे. या कारवाईमुळे गंभीर गुन्ह्यातील मुख्य आरोपी पोलिसांच्या ताब्यात आला असून आणखी एका खुनाच्या गुन्ह्याचाही उलगडा झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परतूर पोलीस ठाण्यात २ जून २०२६ रोजी एका व्यापाऱ्यावर चार अज्ञात इसमांनी जीवघेणा हल्ला करून रोख रक्कम लुटल्याप्रकरणी गुन्हा क्रमांक २७७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३११, ६२ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथके नियुक्त करण्यात आली होती. यापूर्वी दोन आरोपींना अटक करण्यात आली होती.



तपासादरम्यान फरार आरोपी खोबऱ्या शिवाजी काळे हा पंढरपूरकडे जाणाऱ्या माऊलीच्या दिंडीत सहभागी असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक सुदाम भगवत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चव्हाण तसेच पोलीस कर्मचारी जाधव, खाडे, हांडे आदींच्या पथकाने वारकऱ्यांचा वेश धारण करून दिंडीत प्रवेश केला. माळशिरस परिसरात आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतल्यानंतर विश्वासात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत त्याने जबरी चोरीची कबुली दिली. तसेच घनसावंगी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक २९६/२०२६ (कलम १०३(१), भारतीय न्याय संहिता) मधील खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी असल्याचेही निष्पन्न झाले. आरोपीने संबंधित खून साक्षीदारासह रानात केल्याची माहितीही चौकशीत दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भगवत, पोलीस उपनिरीक्षक उद्धव चव्हाण, पोहेकॉ दिविदास जाधव, पोकॉ भगवत खाडे, पोकॉ राम हांडे व पोकॉ नरेंद्र चव्हाण यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते करीत आहेत.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राहुल लोणीकरांचे २६ वे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त परतूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात भाजपचे प्रदेश सचिव तथा कृषी उत्पन्न बाजार समिती परतूरचे सभापती राहुल लोणीकर यांनी आपले २६ वे रक्तदान करून समाजापुढे प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

यावेळी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक व नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

रक्तदानानंतर राहुल लोणीकर म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, आपल्या एका रक्तदानामुळे एखाद्या गरजू व्यक्तीचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. त्यांनी विशेषतः युवकांना रक्तदान चळवळीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिरासोबतच नागरिकांशी संवाद, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि सामाजिक जनजागृतीचे उपक्रमही पार पडले.

## जालन्याला २,१९१ कोटींची कर्जमाफी, २,४९५.५४ कोटींची वीजबिल माफी; ३.४३ लाखांहून अधिक शेतकरी लाभार्थी –आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने ३६,५८५ कोटींच्या या ऐतिहासिक योजनेला मंजुरी देत राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. पात्र शेतकऱ्यांचे मुद्दल व व्याजासह २ लाखांपर्यंतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज माफ करण्यात येणार असून, २ लाखांपेक्षा जास्त थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठी वन टाइम सेटलमेंट (जढड) ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती देण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी आज जालना येथे पत्रकार परिषद आयोजित केली. यावेळी नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, संभाजी वारे, सुजित जोगस, सर्जेराव जाधव, शिवराज नारियलवाले यांची उपस्थिती होती. शेतकरी कर्जमाफी, वीजबिल माफी, मोफत वीज, सौर कृषी पंप आणि कृषी विकास योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाने शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे त्यांनी सांगितले. गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.४५ वाजता नवीन मोंढा रोडवरील द फर्न हॉटेल येथे ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या योजनेत सुरुवातीला १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीक कर्ज, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली कर्जे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे पात्र ठरविण्यात आली होती. त्यानंतर शासनाने आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक (फार्मर आयडी), ई-केवायसी आणि डिजिटल पडताळणीची अट लागू करून योजनेत पारदर्शकता वाढविली. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अटींमध्ये शिथिलता देऊन अतिरिक्त २३ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा केला आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.ही त्यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून घेतलेल्या या निर्णयांमुळे महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा, स्थैर्य आणि विकासाची नवी संधी मिळाल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे. कर्जमाफी, वीजबिल माफी, मोफत वीज, सौर पंप, सिंचन आणि कृषी विकास योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाने शेतकरी हिताचा सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारला असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २६ जुलै रोजी 'कारगिल विजय दिवस' सोहळ्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जुलै : जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत रविवार, २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजता लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे २७ वा कारगिल विजय दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कारगिल युद्धात देशसेवेसाठी अभूतपूर्व शौर्य गाजवणाऱ्या आणि बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व त्यांच्या परिवाराचा सन्मान करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, शौर्यपदकप्राप्त माजी सैनिक तसेच माजी सैनिकांच्या विधवा भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.



## विविध वृत्त.....

### लातूर येथे २७ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जुलै : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्यभरात २२ जुलै २०२६ ते ०२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी लातूर येथील पार्वती मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये एकाच ठिकाणी नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा 'एक खिडकी प्रणाली'द्वारे उपलब्ध करून दिल्या जाणार असून, यामध्ये सातबारा व फेरफार दुरुस्ती, डिजिटल सातबारा सेवा, विविध प्रकारची दाखले व प्रमाणपत्रे वितरण, महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, गावठाण स्वामित्व सनद, फार्मर आयडी, महिलांचे नाव अधिकार अभिलेखात समाविष्ट करणे, पात्र निवासी अतिक्रमणे नियमितीकरण, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनांबाबत मार्गदर्शन, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना, शिधापत्रिका वितरण तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ व मार्गदर्शन प्रत्यक्ष उपलब्ध करून दिले जाईल.

महसूल सेवांबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी मोफत सर्वसमावेशक आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून, यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत डोळ्यांची तपासणी, मधुमेह (शुगर), उच्च रक्तदाब, महिलांचे आरोग्य, हाडांचे आजार, कर्करोगाबाबत प्राथमिक तपासणी व मार्गदर्शन, रक्त तपासणी तसेच आवश्यक आरोग्यविषयक सल्ला मोफत दिला जाणार आहे. यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी शिबिरात हरितोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून विविध प्रकारच्या फळझाडांची व उपयुक्त वृक्षांची रोपे नागरिकांना उपलब्ध करून देऊन वृक्षलागवडीबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

तसेच महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला व बालकल्याण योजनांची माहिती व लाभ आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून (एस.टी. महामंडळ) सवलत योजना व प्रवासी कल्याण योजनांबाबत मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. या शिबिरात विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करतील. तरी लातूर शहर मतदारसंघातील सर्व नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी लातूर, श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

### अजित पवार यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



लातूर, दि. २३ जुलै : दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, गणेश पवार, तहसीलदार राजभाऊ कदम, तहसीलदार संतोष बनकर यांच्यासह जिल्हाधिकारी अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ.कराड यांनी केले : पै. दिनानाथ सिंग

तभा वृत्तसेवा

लातूर , दि. २३ जुलै: लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. विश्र्वनाथ कराड यांनी केले आहे. त्यांनी शक्तिची पूजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, त्यांच्यामुळे वाखरी फुलली आहे. असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी व्यक्त केले.



विश्र्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्र्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. केंद्र (आळंदी),माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा.कराड यांच्या आशीर्वादाने व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्र्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्र्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, नजरुद्दीन नायकवडी आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्याचप्रमाणे हभप तुळशीराम कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड,डॉ. हनुमंत तुळशीराम कराड, राष्ट्रीय कुस्तीगीर महेश वरूटे, सुरजीत सिंग, श्रीकांत देशमुख, सामाजिक कार्यकर्ता सालगुडे पाटील, कदम पाटील, सरकार निंबाळकर, कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, भीमराव आदलिंग, शिवाजीराव काळे, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

हिंदकेसरी पै. दिनानाथ सिंग म्हणाले, हा सोहळा मन आणि चित्त प्रसन्न करतो. त्यामुळे येथे येणार्या प्रत्येक भक्ताला तीर्थक्षेत्रात आल्याची अनुभूती मिळते. डॉ. कराड यांनी वैष्णवांच्या मेळाव्यात कुस्तीचा आखाडा भरविला आहे. येथे भक्ती आणि शक्तीचा आदर्श उभा राहिलेला दिसत आहे.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारकरी संप्रदाय परंपरा ७५० वर्ष जुनी आहे. या परंपरेचे पाईक विश्र्वधर्मी डॉ. विश्र्वनाथ कराड यांनी समाज घडविण्यासाठी विश्र्वशांती केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून सर्व संतांची शिकवण पुढे चालू ठेवली आहे. यातून आत्मचिंतनाची दिशा दाखवली आहे. वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. याच कार्याचा भाग म्हणजे ही कुस्ती स्पर्धा आहे. प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक व कुस्ती स्पर्धाचे नियोजन केले. बाबा निम्हण यांनी धावते समालोचन केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले.

## चालक सीटवर प्रवासी बसवले; ३९ ऑटो रिक्षांवर कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जुलै : जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली २२ जुलै रोजी लातूर येथील शिवाजी चौक परिसरात प्रादे शिक परिवहन कार्यालयाचे वायुवेग पथक आणि लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखा यांच्या वतीने संयुक्त विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. लातूर शहरामध्ये ऑटोरिक्षा चालकांकडून वाहनांच्या आसन व्यवस्थेत अनाधिकृत बदल करून चालकाच्या शेजारी प्रवासी बसवणे तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून नागरिकांची सुरक्षा घोक्यात आणली जात असल्याच्या पार्श्र्वभूमीवर ही मोहीम हाती घेण्यात आली होती.



या मोहिमेत मोटर वाहन निरीक्षक प्रकाश मुळे व अमोल कोकरे, तसेच सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक दिपाली जाधव, राहुल देवगुंड आणि प्रवीण दरेकर यांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. या कारवाईदरम्यान वाहनांच्या रचनेत अनाधिकृत फेरफार करणाऱ्या आणि धोकादायक रीतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या एकूण ३९ ऑटोरिक्षांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कडक कारवाई करत १ लाख ३० हजार रुपये इतका दंडात्मक महसूल वसूल करण्यात आला.

कारवाईदरम्यान लातूरचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे आणि लातूर शहराचे पोलीस उपअधीक्षक समीरसिंह साळवे यांनी ऑटोरिक्षा चालकांशी संवाद साधला. त्यांनी चालकांना प्रवाशांच्या सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देत, भविष्यात प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण होईल, अशा प्रकारे नियमबाह्य वाहतूक केल्यास याहून अधिक कठोर कारवाई केली जाईल असा इशारा दिला, तसेच मोटार वाहन कायदे व रस्ता सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले.

### मध केंद्र योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जुलै : उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या १८ जून २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत संपूर्ण राज्यात मध केंद्र योजना (मधमाशा पालन) कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील पात्र व्यक्ती व संस्थांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असल्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी केले आहे.

## लोकमान्य टिळक यांचे स्मारक वर्षभरामध्ये उभारणार : महापौर जयश्री सोनकांबळे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जुलै : लातूर शहरांमध्ये बहुतांश सर्व समाज सुधारकांची स्मारके उभारली गेली आहेत परंतु लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्मारक गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे या स्मारकाच्या उभारणीसाठी ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या सर्व समस्यांची सोडवणूक माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळामध्ये पूर्ण करून त्याची उभारणी आगामी वर्षभरामध्ये करण्याची हमी महापौर जयश्री सोनकांबळे यांनी दिली आहे.



लातूर शहरात लोकमान्य टिळक चौक येथे आज गुरुवार दिनांक २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी त्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्थानावरून बोलत होत्या.

लातूर शहरात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी महापौर जयश्री सोनकांबळे, तर लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त राहुल कुलकर्णी, लातूर शहर महानगरपालिकेतील काँग्रेसचे गटनेते, विजयकुमार साबदे, नगरसेवक प्रवीण कस्तुरे, प्रेरणा होनराव, ड. दीपक मठपती, यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्या पुढे म्हणाल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे ज्येष्ठ समाज सुधारक होते त्यांच्या विचाराची आणि कार्याची जपणूक प्रत्येक लातूरकराकडून झाली पाहिजे. त्यांचे विचार अंगीकारले गेले पाहिजेत. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे तो मी मिळविणारच यातून त्यांनी प्रेरणा दिली. तर गणेश उत्सवासारखा लोकसहभाग निर्माण होणारा उत्सव सुरू केला. धार्मिक उत्सव साजरा करण्याची परंपरा त्यांनी निर्माण केली त्यांची ही प्रेरणा लातूरकरांसाठी सदैव प्रेरणादायी ठरणार आहे त्यामुळे त्यांच्या विचाराची जपणूक होण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून त्यांचे स्मारक प्रलंबित आहे त्याची पूर्तता मी माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळामध्ये नक्कीच करेन यासाठी मी लातूर शहर महानगरपालिका प्रशासन आणि शासन यांच्याकडे नक्कीच पाठपुरावा करेन अशी हमी त्यांनी यावेळी दिली.

### जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांचे स्वागत



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जुलै : धाराशिवचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांची लातूर येथे त्याच पदावर बदली झाली आहे. नुकताच त्यांनी पदभार स्वीकारला असता राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी अधीक्षक व्ही. आर. काळे, ज्ञानेश्र्वर गोसावी, विजयकुमार धनशेट्टी, वासंती काळे, पूजा भोसले, सतीश श्रीमंगले, गोविंद गुट्टे, प्रभाकर सूर्यवंशी, उमाकांत गायकवाड, शिवकांत वाडीकर, अनिल वाघमारे आदि उपस्थित होते.यावेळी औताडे व प्राचार्य केंद्रे यांनी जिल्ह्यातील शासकीय आणि खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), तांत्रिक शाळा आणि अल्प मुदतीचे प्रशिक्षण देणार्या संस्थांबाबत चर्चा झाली.

## रेणापूर येथील समाधान शिबिरात विविध योजनेतील अनेकांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण

# शासकीय योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये : आ. कराड

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२३ जुलै : देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री विकासपुरुष देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने अठरापगड जाती धर्मांना, गोरगरीब सर्वसामान्य माणसांला केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजने पासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिराचे आयोजन केले असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्र्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेचे समाधान करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या जयंती निमित्ताने शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे रेणापूर येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, भुमीअभिलेख जिल्हा अधीक्षक नसीम पटेल, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, लातूरचे सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे, जिपच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पंस सभापती मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, पद्माकर चिंचोलकर, मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ता समिती सहअध्यक्ष सुरज शिंदे, संगायो समितीचे रेणापूर तालुका अध्यक्ष सतीश आंबेकर, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, भागवत सोट, अभिषेक आकनगिरे, अनिल भिसे, बालाजी गोटके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या समाधान शिबिर प्रसंगी विविध गावचे लोकप्रतिनिधी, लाभार्थी, महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शुभेच्छा देऊन स्वर्गीय अजितदादा पवार यांना आदरांजली अर्पण करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या नेतृत्वात देशाने आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने विकास कामात एक वेगळी उंची गाठली असून त्यांनी सुरू केलेल्या विविध जनकल्याणकारी योजना पात्र आणि गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी समाधान शिबिराचा निश्र्चितपणे फायदा होईल.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आत्तापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली असून याचा ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तर महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी क्रांतिकारी निर्णय घेऊन मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली या योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघात येत्या दोन वर्षात एकही शेत रस्ता शिल्लक राहणार नाही प्रत्येक शेतकऱ्यांना मजबूत आणि पक्का रस्ता देण्याचे काम शासनाच्या वतीने हाती घेण्यात आले असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

गावागावात शिव रस्त्याची कामे करताना कोणीही कोणाचीही आडवणूक करू नये असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी आडवणूक करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने एकही शेतरस्ता अतिक्रमित राहणार नाही सर्व रस्ते मोकळे होतील. कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही अशी माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही. पात्र लाभार्थ्याचे जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत हे काम थांबणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे आणि संदीप कुलकर्णी यांनी एकाच छताखाली शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी सन्मान निधी, मोफत वीज पुरवठा, सोलर पंप, लाडकी बहीण, मोफत राशन, घरकुल, विहिरी, लखपती दीदी योजना यासह सर्व योजनाचा पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची समाधान शिबिराच्या माध्यमातून सोय करण्यात आली असल्याची माहिती दिली. प्रारंभी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समाधान शिबिर आयोजनामागची भूमिका विषद करून या शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलवर आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घ्याव्यात असे बोलून दाखविले.

रेणापूर येथील समाधान शिबिरात महिला शेतकरी प्रमाणपत्र, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गाव नकाशे, ट्रॅक्टर वाटप, सांगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, लेक लाडकी योजनेचा हप्ता, लखपती दीदी योजनेचे पत्र, बचत गटांना कर्जमुक्ती प्रमाणपत्र, बेबी केअर किट यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. शेवटी तहसीलदार प्रशांत थोरात यांनी आभार मानले.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन ; अंबाजोगाई तहसील कार्यालयाच्या जनमाहिती अधिकाऱ्यास २० हजारांचा दंड

## राज्य माहिती आयोगाचा आदेश ; माहिती न दिल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना वेतनातून दंड वसूल करण्याचे निर्देश

**अंबाजोगाई :** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नागरिकाने मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करून न देणे, तसेच राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतरही माहिती न देत आयोगाकडे खुलासा सादर करण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी अंबाजोगाई तहसील कार्यालयातील संबंधित जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांच्यावर २० हजार रूपयांचा दंड ठोठावण्याचा आदेश राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी दिला आहे. राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर (राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर) यांनी हा आदेश पारित केला असून, दंडाची रक्कम संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून वसूल करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, बीड यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.

याबाबत प्राप्त अधिक माहिती अशी की, शहरातील मिलिंदनगर, अंबाजोगाई येथील सामाजिक कार्यकर्ते तथा अपीलार्थी अनिल हरीभाऊ समुद्रे यांनी १ जुलै २०२४ रोजी तहसील कार्यालय, अंबाजोगाई येथे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सहा स्वतंत्र माहिती अर्ज दाखल केले होते. मात्र अधिनियमात नमूद केलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी १५ डिसेंबर २०२५ रोजी झाली होती. त्यावेळी आयोगाने संबंधित जनमाहिती अधिकाऱ्याला माहिती न दिल्याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. तसेच अर्जदाराला आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देशही दिले होते. मात्र आयोगाच्या आदेशानंतरही संबंधित अधिकाऱ्याने ना माहिती उपलब्ध करून दिली, ना आयोगासमोर कोणताही लेखी खुलासा सादर केला. त्यानंतर झालेल्या अंतिम सुनावणीत अपीलार्थी अनिल समुद्रे यांनी आयोगासमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून आयोगाच्या आदेशानंतरही माहिती मिळालेली नसल्याचे सांगितले व संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. उपलब्ध कागदपत्रे, सुनावणीतील नोंदी आणि संबंधित अधिकाऱ्याने खुलासा न सादर केल्याची बाब विचारात घेऊन आयोगाने संबंधित जनमाहिती अधिकाऱ्याने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याचा निष्कर्ष नोंदविला. तसेच आयोगाच्या आदेशांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून माहिती अधिकार कायद्याबाबत नकारात्मक भूमिका घेतल्याचे निरीक्षणही आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २०(१) तसेच कलम १९(८)(क) अन्वये संबंधित जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (तहसील कार्यालय, अंबाजोगाई) यांच्यावर रूपये २०,००० (अक्षरी – वीस हजार रूपये) इतकी शास्ती अंतिम करण्यात आली. आयोगाने जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणात माहिती न देण्यास जबाबदार असलेल्या जनमाहिती अधिकाऱ्यांची नांवे निश्चित करून संबंधितांच्या वेतनातून दंडाची रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच शासनाच्या निर्धारित लेखाशिर्षात ती रक्कम जमा करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. यासोबतच, अपीलार्थी अनिल समुद्रे यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करून देण्याबाबतचा आयोगाचा पूर्वीचा आदेश कायम ठेवण्यात आला आहे. राज्य माहिती आयोगाच्या या निर्णयामुळे माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती वेळेत देणे ही जनमाहिती अधिकाऱ्यांची वैधानिक जबाबदारी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आयोग कठोर भूमिका घेत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# दिल्लीतील आंदोलना पाठिंबा; माजलगावमध्ये भव्य मोर्चा

## विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय: सरकारच्या विरोधात घोषणा

**माजलगाव ( प्रतिनिधी ) :** दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा तसेच आंदोलनकर्त्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ दि. २२ जुलै बुधवार रोजी माजलगाव येथे सर्व विरोधी पक्षीच्यावतीने विराट मोर्चा काढण्यात आला. या विराट मोर्चात विद्यार्थी,पालक व लोकशाहीवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दिल्ली येथील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व स्पर्धा परीक्षा व प्रवेश प्रक्रियेत वारंवार निर्माण होणारा गोंधळ,निट,टि.ई.टी परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणानंतर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, पारदर्शक भरती प्रक्रियेची मागणी, तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर शासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करत बुधवार रोजी सकाळी ११:०० वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालय ते डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत विराट मोर्चा काढण्यात आला. विराट मोर्चात पालक , लोकशाहीवादी नागरिकांनीतसेच विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी होते.

# संगीत साधना मंच आणि आदर्श गणेश प्रतिष्ठान अंबाजोगाई आयोजित 29 वी मासिक शास्त्रीय संगीत सभा



**अंबाजोगाई :** रविवार दिनांक 26 जुलै 2026 रोजी सायंकाळी ठीक साडेसहा वाजता श्री कपिल गणेश मंदिर आदर्श कॉलनी अंबाजोगाई येथे नियोजित झाली आहे. या संगीत सभेमध्ये सोलापूर येथील प्रथितयश गायिका सौ. वैशाली देशपांडे यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. त्यांना तबल्यावर श्री रत्नदीप शिंगे आणि संवादिनीवर श्री विश्वजीत धाट हे साथ संगत करतील. या संगीत सभेचा सर्व संगीत साधक व रसिकांनी लाभ घ्यावा असे नम्र आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्राम शक्ती वेल्फेअर फाउंडेशनचा पुढाकार ; वरपगाव जि प प्रा शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल कीट वाटप

**केज दि २२(प्रतिनिधी) :** अंबाजोगाई येथील ग्राम शक्ती वेल्फेअर फाउंडेशन व सेवा सहयोग फाउंडेशन पुणे यांच्या वतीने तालुक्यातील वरपगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना स्कूल कीटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रजाक भाई पठाण प्रमुख पाहुणे तलाठी बालाजी इंगळे, सरपंच अमृता आकाश कांबळे ,वाल्मीक बापू कांबळे, पोलीस पाटील अरुण गालफाडे, केंद्रप्रमुख संतोष नखाते,मुख्याध्यापक यु. डी.पाटील उपस्थित होते. यावेळी ग्राम शक्ती वेल्फेअर फाउंडेशन अंबाजोगाई चे युवा प्रशिक्षणार्थी आर्यन अरविंद शिंदे, तन्मय मोहिते, गोविंद एकशिंगे, किशन घुले,शामल बनसोडे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना किट उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले, फाउंडेशन कडून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केलेल्या सहकार्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व सहशिक्षकांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन,आभार अभिजीत शिंदे यांनी केले.

# परळीतील नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालयाला शासनाची 13 हेक्टर जमीन विनामूल्य

## पंकजाताई मुंडे यांनी मानले आभार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयानंतर शासन आदेश निर्गमित

**मुंबई :** परळी येथे नव्याने होत असलेल्या पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय उभारण्यासाठी १३ हेक्टर शासकीय जमीन विनामूल्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून तसा शासन आदेश महसूल व वन विभागाने निर्गमित केला आहे. दरम्यान या निर्णयाबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

परळीच्या सर्व्हे क्रमांक ४७८ मधील १३ हेक्टर शासकीय जमीन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना 'भोगवटादार वर्ग-२' या अटीवर विनामूल्य व महसूलमुक्त स्वरूपात हस्तांतरित करण्यात येणार आहे. महसूल विभागाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४० तसेच संबंधित नियमांनुसार ही जमीन प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाने या जमिनीच्या वापराबाबत काही महत्त्वपूर्ण अटी घातल्या आहेत. ताबा मिळाल्यानंतर तीन वर्षांच्या आत या जमिनीवर प्रस्तावित पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम प्रत्यक्ष सुरू करणे बंधनकारक राहील. तसेच ही जमीन केवळ पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठीच वापरता येईल. जमीन विक्री, हस्तांतरण, देणगी किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी वापरण्यास परवानगी राहणार नाही.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात अजितदादा पवार यांची जयंती साजरी

## वृक्षारोपण करून केले अभिवादन



**माजलगाव प्रतिनिधी :** येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी परिसरात वृक्षारोपण करून व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालय विकास समिती प्रमुख ॲड. बी. आर.डक व प्र. प्राचार्य डॉ. एन. के.मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रकाश गवते व उपप्राचार्य पवनकुमार शिंदे,प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना ॲड.बी. आर. डक म्हणाले की, अजितदादा पवार हे विकासाभिमुख नेतृत्व होते.त्यांना सतत विकासाचा ध्यास होता.कामाचा माणूस म्हणून त्यांची ओळख होती.त्यांच्या अकस्मात जाण्याने महाराष्ट्र पोरगा झाला .

अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. एन.के. मुळे म्हणाले की,अजितदादा हे सर्वसामान्यांचे नेते होते. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी राजकारणातून समाजकार्य केले. त्यामुळे सामान्य माणसालाही अजित दादा आपले नेते वाटत होते.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात आरोग्य विषयक जनजागृती व्याख्यान संपन्न



**बीड :** बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या कर्मचारी समन्वय समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा अंतर्गत आरोग्य विषयक जनजागृती या विषयांतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम महाराष्ट्राचे दिवंगत नेते व माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित अनंतराव पवार अजित दादा यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कर्मचारी समन्वय समितीचे सदस्य डॉ. गोपाळ धोंड यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रा. संजय काळे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे, डॉ कृष्णा बारटक्के, डॉ. अनंत देशपांडे, महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

यानंतर बीड येथील विश्व हॉस्पिटलचे संचालक डॉ. विशाल पिंगळकर त्यांनी मेंदू व मणका या उपचार पद्धती विषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले ब्रेन आणि स्पाइन (मेंदू आणि मणका) पुनर्वसन (Re-habilitation) ही एक विशेष वैद्यकीय प्रक्रिया आहे, ज्यामध्ये स्ट्रोक, पक्षाघात, मणक्याची दुखापत, किंवा शस्त्रक्रियेनंतर गमावलेली शारीरिक व मानसिक कार्यक्षमता पूर्ववत केली जाते.

# जंतर- मंतरवरील लाठीमाराच्या निषेधार्थ अंबाजोगाई बंदला प्रतिसाद : घाटनांदूरमध्येही कडकडीत बंद...!



**अंबाजोगाई :** जंतर-मंतर येथे NEET परीक्षा आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या 23 जुलैच्या ‘महाराष्ट्र बंद’ च्या हाकेला अंबाजोगाई शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच घाटनांदूर येथेही कडकडीत बंद पाळण्यात आला.

सकाळपासूनच वंचित बहुजन आघाडी, डावे पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अंबाजोगाई शहरातून मोटरसायकल रॅली काढून व्यापारी व नागरिकांना बंदचे आवाहन केले.

शहरातील प्रमुख मार्गांवरून ही रॅली काढण्यात आली.

बंदला प्रतिसाद देत अंबाजोगाईतील बहुतांश शाळा, महाविद्यालये आणि व्यावसायिक आस्थापना दिवसभर बंद ठेवण्यात आल्या. व्यापारी बांधवांनीही विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा – सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी शहरात ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. संपूर्ण बंद शांततेत पार पडल्याचे चित्र अंबाजोगाई आणि घाटनांदूर येथे पाहायला मिळाले.

# विशेष ग्रामसभेतून स्वइच्छेने पुनर्वसनासाठी पुढे येणाऱ्या कुटुंबांची इत्यंभूत माहिती गोळा करा : विवेक जॉन्सन

## आमदार सुरेश धस यांचा पुनर्वसनासाठी पुढाकार, खुंटेफळ आणि कुंबेफळच्या पुनर्वसनाला गती, मे 2028 पर्यंत पुनर्वसन प्रक्रिया होणार पूर्ण

**बीड, दि. 23 (जिमाका) :-** कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलावामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाला आता गती देण्यात येत आहे. भुमि संपादन आणि पुनर्वसन कायद्यातील (2013) कलम 108 नुसार प्रकल्पग्रस्तांना वाजवी भरपाई आणि सर्व आवश्यक सुविधा दिल्या जाणार आहेत. तरी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी पुढाकार घेत गावच्या सरपंचांनी विशेष ग्रामसभा आयोजित करुन स्वइच्छेने पुनर्वसनासाठी पुढे येणाऱ्या कुटुंबांची इत्यंभूत माहिती गोळा करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत.

आष्टी तालुक्यातील उपसा सिंचन योजना क्र. 3 मधील खुंटेफळ साठवण तलाव बाधित मौजे खुंटेफळ व कुंबेफळ येथील पुनर्वसन आणि पुनर्स्थापना योजनेच्या प्रारुप अहवालाचे पुनर्वलोकन (कलम 17 (1) अन्वये) करण्यासाठी आयोजित केलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहातील बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार सुरेश धस, उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख आणि बाधित गावांचे सरपंच, माजी सरपंच यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, महाराष्ट्रातील एकुण कृष्णा खोऱ्याच्या क्षेत्राच्या तुलनेत धाराशिव व बीड या मराठवाड्यामधील जिल्ह्यातील कृष्णा खोऱ्यातील क्षेत्र हे सर्व साधारण 8.39 टक्के इतके आहे. कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचे बांधकाम 2 टप्प्यात करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या प्रथम टप्प्याच्या मान्यतेनूसार खुंटेफळ साठवण तलावाची साठवण क्षमता 1.68 टीएमसी/ 47.57 द.ल.घ.मी. इतकी आहे. पर्यावरण मान्यतेनूसार खुंटेफळ साठवण तलावाचे काम हाती घेण्यात आले असून सद्यस्थितीत एकुण 58 लक्ष घनमीटर मातीकामापैकी 40.60 लक्ष घनमीटर म्हणजे 70 टक्के काम पुर्ण झालेले आहे. माती धरणाची उर्वरीत कामे व सांडव्याची कामे प्रगतीपथावर असून मार्च 2027 पर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करुन सदर साठवण तलावाची घळभरणी करण्याचे नियोजित आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार सुरेश धस यांनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पुढाकार घेतला. त्यांनी आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ (पुं) व मौजे कुंबेफळ या दोन्ही गावातील कुटुंबे, लोकसंख्या, रोजगार, शेती आणि ग्रामस्थांच्या अडीअडचणी आदिची सविस्तर मांडली केली. गावकऱ्यांच्या हिताचा विचार करून, प्रत्येक कुटुंबाची लोकसंख्येनुसार अचुक माहिती गोळा करण्यास त्यांनी सहमती दर्शविली. या बैठकीमुळे या दोन्ही गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न आता वेगाने आणि नियोजित पद्धतीने सुटण्यास मोठी मदत होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ पुंडी, कुंबेफळ, बाळेवाडी व सोलापूरवाडी व पुंडी या एकुण 5 गावापैकी मौजे खुंटेफळ पुंडी व मौजे कुंबेफळ या दोन गावांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. मौजे खुंटेफळ पुंडी या गावची लोकसंख्या 1230 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 612 अशी आहे. तर मौजे कुंबेफळ या गावची लोकसंख्या 1049 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 437 अशी आहे. तर मौजे खुंटेफळ पुंडी या गावात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या 108 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 62 अशी आहे. तसेच मौजे कुंबेफळ या गावात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या 136 असून बाधित किंवा विस्थापित होणाऱ्या कुंटुंबाची संख्या 70 अशी आहे. पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्यामार्फत बाधित क्षेत्रात आवश्यक सर्वेक्षण करण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता आष्टी तालुक्यातील मौजे कुंबेफळ येथील गायरान जमीन गट नं 60 येथील क्षेत्र 32.02 हे. आर जमिनीची निवड करण्यात आली आहे. तर मौजे खुंटेफळसाठी मौजे वाहिरा येथील जमीन गट नं 43, 47 येथील क्षेत्र 44.00 हे. आर. व मौजे सोलापूरवाडी येथील जमीन गट नं. 10 क्षेत्र 44.00 हे. आर. जमिनीची स्थळ पाहणी, जागा निश्चिती समितीमार्फत प्रस्तावित आहे. तसेच नगर रचना विभागाकडून मान्यताप्राप्त लेआउटनुसार आणि स्वेच्छा पुनर्वसनाच्या कार्यवाहीस अधीन राहून प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटप केले जातील. तसेच सर्व नागरी सुविधा पुरवून मे 2028 पर्यंत पुनर्वसनाची संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्याचे प्रशासनाने ठरविले आहे.

# धानोरा खुर्द येथे उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा ग्रामस्थांतर्फे सत्कार



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द येथे ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांच्या वतीने गावात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गुरुवार (दि. 23) रोजी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

गावातील सामाजिक, शैक्षणिक, कृषी, महसूल व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी शाल व आंब्याचे रोप देऊन सन्मान करण्यात आला. युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दारूबंदी करणारे नव्याने रुजू झालेले सहायक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे,गावात दारूबंदी मोहिमेसाठी विशेष योगदान दिल्याबद्दल बनसारोळा बिट अंमलदार अरुण मोरे, श्री चव्हाण , महाराष्ट्र शासनाचा 'कृषी सेवा रत्न' पुरस्कार प्राप्त सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे, गेली सात वर्षे विना तक्रार महसुली सेवा देणारे ग्राम महसूल अधिकारी सुहास चाटे, नव्याने पोलीस पाटीलपदी निवड झालेले श्रीराम सतीश ढगे, तसेच उत्कृष्ट शैक्षणिक सेवा दिल्याबद्दल शिक्षक कचरू रंजवे, सूर्यकांत धायगुडे, सहशिक्षिका शेख अंजुम व शेख नाजिमा यांचा गौरव करण्यात आला.

याशिवाय पेरू लागवडीतून भरघोस उत्पादन घेऊन आदर्श शेतीचा आदर्श निर्माण करणारे शेतकरी गजानन जगताप यांचाही ग्रामस्थांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्तींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमास सरपंच पार्वतीबाई पोळ, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद जोगदंड, बालासाहेब गुणाले, दिलीपराव ढगे, लायक सय्यद, बाळासाहेब जगताप, रज्जाक पटेल, बाबुराव कासले, मदन पुरी, अशोक साबळे, रहेमान पटेल, भरत जगताप, बालासाहेब ढगे, अस्लम सय्यद, जमलोदिन सय्यद, मनीषा गोवगावकर, कौशल्या ढगे, अश्विनी ढगे यांच्यासह गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

जा.क्र.जि.ग्रा.आ./बीड/ १३५१
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,
बीड. जिल्हा कार्यालय : शाहूनगर,
पांगरी रोड, बीड-४३११२२
दिनांक: २१ जुलै २०२६

DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED
Under the Consumer Protection Act, 2019

Telephone No.: 02442-230501 Email: confo-bi-mh@nic.in Website:
HOUSE NO.1-4-1600, UTTAMNANDA BUILDING, IST FLOOR, AMBIKA CHOWK, PANGRI ROAD, SHAHU NAGAR DISTRICT BEED MAHARASHTRA
CONSUMER CASE NO. DC/470/CC/182/2024
RAJENDRA S/O. SUKHADEORAO GAIKWAD....Petitioner/Appellant
Versus
JIJAU MASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK PRESIDENT, ANITA W/O. BABAN SHINDE. .....Opposite Party/ Respondent(s)
To,
Opposite Party / Respondent Name:
1. ASHWINI W/O SUNIL WANDHARE, MUKHY PRAMBHADAK, JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED. R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., MAHARASHTRA BEED- 2. YOGESH S/O NAVNATHRAO KARANDE, SANCHALK, JIJAU MASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD BEED. R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., MAHARASHTRA BEED- 3. BABAN S/O WISHWANATH SHINDE SANCHALK, JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED. R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., MAHARASHTRA BEED-

जाहिर प्रगटन

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फ उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड
यांची आदेशानुसार.
दिनांक २०/०७/२०२६

प्रबंधक
ठिकाण - बीड
जिल्हा ग्राहक तक्रार,
निवारण आयोग, बीड

विशेष वसुली अधिकारी, अंबाजोगाई यांचे कार्यालय,
द्वारा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मुख्य कार्यालय,परळी-रोड, अंबाजोगाई-४३१ ५१७
जा.क्र/ दीन /वि.वसुली /७०१६-२८/१०७/२०२६-२७.
दिनांक :- २२.०७.२०२६

[नियम १०७ पोट-नियम (११ (ड-११) पहा)]
स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी श्री.अनंत गोपाळराव देशपांडे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ अन्वये असून **१४.१२.२०२२** रोजी मागणीची नोटीस ऋणको **श्री. रत्नाकर अंबादासराव देशमुख** यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.२,३३,९५,५३९/- (अक्षरी- दोन कोटी तेहतिस लाख पंच्यानव्व हजार पाचशे एकोणचाळीस रु.) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे.

खाली सही करणाऱ्याने दिनांक २१.०२.२०२३ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोणे रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना,खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ मधिल नियम १०७ ११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दिनांक २२.०७.२०२६ दिवशी सन २०२६-२७ वर्षी ताबा घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यासविशेष वसुली अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई यांच्या बोजाची खाते क्र.४-७०१६-२८ रक्कम रु.४,५२,९५,६६५/- (चार कोटी बावन्न लाख पंच्यानव्व हजार साहशे पासाष्ट रु.) अधिक दिनांक ०१.०७.२०२६ पासुन त्यावरील व्याज याला अधीन रहावे लागेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन
श्री. रत्नाकर अंबादास देशमुख यांच्या कर्ज प्रकरणात श्री. दिलीप विठ्ठल जाधव यांची मौजे मांडाखळी ता.जि. परभणी येथील गट क्र.३४५ क्षेत्र ८० आर. ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

पुर्व :- नाला
पश्चिम :- यशवंत जाधव यांची जमीन
दक्षिण :- मुरलीधर जाधव यांची जमीन
उत्तर :- गुलाब यांची जमीन

दिनांक:- २२.०७.२०२६
स्थळ:- मौजे मांडाखळी ता.जि. परभणी

विशेष वसुली अधिकारी